रामकृष्ण परमहंस
अंबुराव महाराज
प्रल्हाद महाराज
निसर्गदत्त महाराज
स्वामी रामतीर्थ
रमण महर्षी
पंत महाराज
निंबरगी महाराज

॥ संतबोध ॥

भाग-२

डॉ. सुहास पेठे

सहस्रबुद्धे महाराज
काकासाहेब तुळपुळे
गुरुदेव रानडे
पूज्य साईबाबा
श्री जे. कृष्णमूर्ती
हनुमंत महाराज
कृष्णदास महाराज
विश्वनाथ महाराज

।। श्री ।।

संतबोध

भाग : २

(उद्‌बोधक संतवचनांची निरूपणे
संतांच्या नव्या आरतीसह)

डॉ.सुहास पेठे

एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

संतबोध : भाग : २

पुस्तकरूपाने प्रकाशित पाचवी आवृत्ती : मार्च २०२०
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

समर्थ सद्‌गुरु

श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

यांना आणि

त्यांच्या आशीर्वादांमुळे लाभलेल्या

अन्य प्रेमळ संतमंडळींना

ही सेवा

- श्रद्धा व कृतज्ञतापूर्वक अर्पण

- सुहास पेठे

संतवचनांचं अथांग दालन..

या युगातील मोठा, दृश्य, सार्वत्रिक चमत्कार म्हणजे संत होत. आपल्यासारख्याच जन्माला आलेल्या, आपल्यासारख्या वातावरणात राहूनही देवपदाला पोचलेल्या, तसंच इतरांनाही हे पद प्राप्त व्हावं, निदान त्यांच्या जीवनातलं दु:खं, चिंता, विवंचना हे थोडं तरी हलकं व्हावं म्हणून निरलसतेनं आपलं आयुष्य वेचणाऱ्या या व्यक्ती म्हणजे सगुण अवतारच होत. ते देहानं गेले तरी सूक्ष्मरूपानं अनंत काळपर्यंत ईश्वरी इच्छेनुसार श्रद्धावंतांसाठी असंच कार्य करीत असतात.

अशा संतांनी माणसावर ठेवलेल्या अनेक ऋणांपैकी एक ऋण त्यांच्या वचनांचं. हे संतवचनांचं दालन अथांग आहे. त्यांतून मिळणारा बोध हा संतांना स्वत:ला झालेला व त्यांनी आचरलेला असल्यानं तो आपल्याला घेण्यासारखा आहे. ज्या असंख्य वचनांनी इतरांप्रमाणंच मलाही आजवर प्रेरणा दिली, प्रसंग -व्यक्ती -विचार यांकडं बघण्याची विधायक, अनेकदा पूर्ण नवीन दृष्टी दिली, त्यांचा कोणास उपयोग होत असल्यास व्हावा या हेतूनं ही संकलनं प्रसिद्ध होत आहेत.

या वचनांच्या मला वाटलेल्या उपयोगाची दिशा समोर यावी यासाठी वचनांचं थोडक्यात निरूपण दिलेलं आहे. संतवचनं अर्थगर्भ व शाश्वत असल्यानं वाचक आपापल्या जीवनाच्या ठेवणी व गरजांनुसार अधिक अर्थ घेऊ शकतीलच. संतांचं, संतवचनांचं व ती मुळात उपलब्ध करून देणाऱ्या प्रकाशकांचं ऋण न फिटणारं आहे. वाचकांच्या सहृदय प्रतिसादामुळं आता ही पुढची आवृत्ती श्रीकृपेनं प्रसिद्ध होत आहे.

संतछायेच्या प्रकाशनांना वाचन, वितरण, पुस्तकांची ने-आण इत्यादी मार्गांनी नेहमीप्रमाणं साहाय्य करणाऱ्या साधकांचा, वाचकांचा तसंच पुस्तक आकाराला येण्यात मदत करणाऱ्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.

संतछाया, सातारा - सुहास पेठे

संतबोध : भाग - २

* वचनक्रम *

क्र.	वचनाचा आरंभ	संतनाम	पृष्ठ
१.	नावे ठेवणारे..	श्री कृष्णदास महाराज	७
२.	व्यावहारिक उत्सव..	श्री हनुमंत महाराज	१२
३.	तुम्ही काय करता..	निसर्गदत्त महाराज	१६
४.	प्राप्त झाले जरी..	विश्वनाथ महाराज	२१
५.	उन्हाळा जाऊन..	प्रल्हाद महाराज	२४
६.	चांगुलपण आणि प्रेम..	जे.कृष्णमूर्ती	२७
७.	आपणाकडून दुराचरण..	निंबरगी महाराज	३०
८.	सत्कर्म हा 'उपाय..	रामकृष्ण परमहंस	३३
९.	आपल्याला ज्याचा अर्थ..	स्वामी रामतीर्थ	३६
१०.	तुमच्या मुक्तीसाठी..	निसर्गदत्त महाराज	४०
११.	प्रत्येक प्राणी हा..	श्री पंत महाराज	४३
१२.	दु:खात सुख पहावे..	अंबुराव महाराज	४७
१३.	जे वाट्याला येईल..	निसर्गदत्त महाराज	५१
१४.	हे देवाने दिले आहे..	काकासाहेब तुळपुळे	५५
१५.	ज्याला कर्माच्या फलाची..	पू. साईबाबा	५९
१६.	सद्‌गुरु माणसांचे..	सहस्रबुद्धे महाराज	६४
१७.	चित्ताची शांतता..	श्री रमण महर्षी	६८
१८.	अंधार कधी पडेल..	गुरुदेव रानडे	७२

*

संतांची आरती

गाऊ संतांची आरती । देव जागा करिती चित्ती ।।धृ।।

निर्गुण दुर्लभ देव झाला । त्यांनी सगुणात आणिला ।।१।।
स्वार्थी जीव जो गुंतला । त्याला परमार्थी लाविला ।।२।। गाऊ..

खोटा कर्ता जो तो झाला । कोण कर्ता तो दाविला ।।३।।
प्रारब्धाची पुसली रेखा । यत्न देव हा ओळखा ।।४।। गाऊ..

मिथ्या अशुद्ध देव गेले । शुद्ध देवांसी स्थापिले ।।५।।
सद्‌गुण स्वप्नीचे वाटले । त्यांनी जगुनीया दाविले ।।६।। गाऊ..

लोकांसम हे जगती आले । मात्र मृत्यू पुसुनी गेले ।।७।।
सूक्ष्म रूपात राहिले । प्रमाण आजहि देती भले ।।८।। गाऊ..

अपार बुद्धीचे सागर । केला सूक्ष्माचा व्यवहार ।।९।।
सोने मातीत दाखविती । मीपण सरता हाती देती ।।१०।। गाऊ..

पैसा भपका केला दूर । साधेपणावरी भर ।।११।।
प्रेम नि:स्वार्थाचे भजन । अवघे त्यागाचे जीवन ।।१२।। गाऊ..

त्यांच्या बोधाचे चिंतन । आम्हा घडो रात्रंदिन ।।१३।।
आचरणाची नित्य सेवा । दीन म्हणे घडो देवा ।।१४।। गाऊ..

।। सब संतन की जय ।।

१.

नावे ठेवणारे आईबापच होत...

- श्री कृष्णदास महाराज

निंदा ही माणसाच्या जीवनातली एक अशी गोष्ट आहे की, जिच्यातून सामान्य-असामान्य कुणी सहसा सुटत नाही. आपल्याकडून घडणारी निंदा टाळणं, तिच्यावर विचारपूर्वक ताबा मिळवणं एकवेळ शक्य आहे. पण दुसऱ्यांकडून घडणाऱ्या निंदांना मात्र सामान्यच काय भल्याभल्यांनाही सामोरं जावं लागतं, हा अनुभव आपल्याला येत असेल. जगाच्या कल्याणासाठी नि:स्वार्थीपणे जीवन जगणाऱ्या संतमहात्म्यांनासुद्धा अशा निंदेला सामोरं जावं लागलेलं आहे. प्रत्यक्ष जगतानाही आणि कित्येकदा मृत्यूनंतरही.

मुळात निंदा केली जाते ती दुसऱ्यांचे दोष पाहाण्याच्या वृत्तीतून. दुसऱ्या व्यक्तीच्या गुणावगुणांची पारख असणं, ते ओळखून असणं वेगळं आणि त्याचं चिंतन करणं, त्याची त्या माणसासमोर किंवा विशेषत: त्याच्या पाठीमागं चर्चा करणं वेगळं. दुसऱ्यातले दोष, उणिवा, दुर्गुण हे लक्षात येणं हा पारख असण्याचा भाग आहे. त्यामध्ये फार चुकीचं काही नाही, उलट त्यात माणसाची एक प्रकारची विकसित समजशक्तीच आहे. पण इतरांच्या दोषांबद्दल लोकांना सांगावसं वाटणं, त्यात आपण जणु काही निर्दोषच आहोत असा भाव असणं, कित्येकदा असे दोष पूर्ण खात्री न करता त्या व्यक्तीत आहेत असं मानणं, त्या त्या व्यक्तीच्या इतर प्रगतीमुळं - गुणांमुळं - कर्तृत्वामुळं त्या व्यक्तीचा मत्सर वाटून हे दोष हुडकून ते

इतरांकडं उगाळणं आणि त्या पटीनं त्या व्यक्तीना उद्वेग-चिंता उत्पन्न करणं - हे मात्र निंदेचं स्वरूप आहे. त्यातही कुठला विषय नसताना, कुणी विचारलेलं नसताना या निंदेला तोंड फोडणाऱ्या व्यक्ती या तर निंदक स्वभावाच्याच म्हणाव्या लागतील. यात त्या निंदकाच्या मनाला एकप्रकारचं सुख मिळत असतं, हे उघडच आहे. पण हे सुख सात्त्विक तर नाहीच पण तमोगुणी आणि त्याज्यच आहे.

यामुळं आपण आपल्यापुरती तरी कुणाची निंदा करू नये, म्हणून प्रयत्नशील राहू. कारण निंदा करणाऱ्याला दोष तर आहेच, संबंधांची हानी आहे, सर्व संबंधितांची मनं कलुषित होणं आहे - जे कदाचित आपल्याच मनात असल्या दोषांचं बीज निर्माण करू शकतं. म्हणून आपण निंदा किंवा इथं म्हटल्याप्रमाणं दुसऱ्यांना नावं ठेवणं टाळावं. पण आपल्याबद्दल इतरांनी केलेल्या निंदेला कसं तोंड देता येईल याचा मात्र वेगळा विचार करावा लागतो.

कारण इतरांनी आपली निंदा करणं-न करणं काही आपल्या हातात नसतं.अशा वेळी कुणी आपल्याला नावं ठेवली-मग ती आपल्या बोलण्याचालण्याला असोत, निर्णयांना असोत, कृतींना असोत, आपल्या माणसांना असोत, आपल्या परिस्थितीला असोत-की मग अनेकदा आपण ते सहन करू शकत नाही. त्यातही आपल्या माघारी कुणीतरी निंदा करणं आणि कुणाकडून तरी ती आपल्या कानावर येणं हा तर अधिकच नकोसा वाटणारा प्रकार असतो.

यात आपल्याला राग यायची, त्रास व्हायची जी कारणं असतात त्यात बहुधा आपल्यावर अन्याय होतो आहे, आपल्यातला दोष दाखवला गेला, इतरांपुढं सांगितला गेला, काही वेळा नीट समजून न घेतल्यानं आपल्यात नसलेला दोष आपल्याला चिकटवला गेला, आपली त्यामुळं सामाजिक-कौटुंबिक अप्रतिष्ठा झाली अशी कारणं मुख्यतः असतात.

पण त्यामुळं आपलं मन नुसतंच दुखावत नाही तर आपल्याकडूनही त्या माणसाच्या दोषांचा शोध सुरू होतो. चिंतन सुरू होतं. वेळी कुठंतरी ते बोलावं म्हणजे आपणही त्याचं उट्टं काढावं असं वाटतं आणि निंदेला बळी पडून आपल्या अंगी नसलेला हा नवा दोषच आपल्यात निर्माण होतो. त्यामुळं अर्थातच आपलं नुकसान होतं. भले आपल्यात मुळात काही दोष असतील, पण आपणही निंदक बनून दोषांत भर घालणं तरी टाळण्याची गरज आहे, हे उघड आहे.

अशा वेळी अशी निंदा दुर्लक्षित करावी, आपण त्यांचा विचार करू नये, आपण कुणाच्या निंदेत सहभागी होऊ नये, निंदा होत असेल अशा ठिकाणाहून निघून जावं - असे अनेक उपायही आपल्याला माहीत असतात. पण श्री कृष्णदास महाराज म्हणतात तशी वृत्ती ठेवणं हा मात्र एकदम वेगळा आणि याच विषयाचा दुसरा पैलू झटकन आपल्यासमोर आणून देणारा आहे. त्यात निंदकांवरचा सोपा उपायही आहे.

'नाव ठेवणं' या शब्दावर कोटी साधून कृष्णदास महाराज सुचवतात की, बालपणी जन्मतः आपल्याला आपले आईवडील'नाव ठेवतात'. तो त्यांचा अधिकारच आहे. ते नाव चांगलं-वाईट कसंही असलं, आपल्याला मोठेपणी, कळतेपणी भले ते आवडो-न आवडो आपण त्याबद्दल आईवडिलांना दोष देत नाही. उलट त्यांच्याबद्दल आदरानंच वागतो.

निंदकही एका दुसऱ्या अर्थानं आपल्याला 'नावंच ठेवीत' असतात. समजा की त्यांनी आपल्याला 'कंजूस' म्हटलं, 'लोभी' म्हटलं हे नाव ठेवणंच आहे. सर्वसामान्य माणसाला याचा रागही येईल. तो विचारी नसेल तर त्या नाव ठेवणाऱ्याशी भांडायला उठेल. त्याचं उणंदुणं काढील. पण महाराज म्हणतात तसा क्षणभर विचार

केला की, अरे हा गृहस्थ आपल्याला कंजूस म्हणतो आहे, एक नाव देतो आहे, आपण थोडाविचार तरी करू. काही तरी असा प्रसंग, घटना जरूर घडली असेल की, ज्यावेळी मी कुठं कंजुसीत वागलो असेन, ते कदाचित नकळत असेल. कदाचित माझ्या दृष्टीनं ती काटकसर म्हणून असेल, उधळपट्टी नको म्हणून मी ते केलं असेल, पण ते पाहाणाऱ्या चार संबंधितांच्या दृष्टीनं कंजुसीचंच लक्षण आहे ना ? माझ्या परिस्थितीच्या मानानं मी खरोखर अजून अधिक खर्च करण्याची तयारी दाखवणं योग्य नसेल कशावरून ?

हा विचार जरी नुसता मनात आला तरी निदान जी त्या निंदकाबद्दलची रागाची, त्राग्याची प्रतिक्रिया आहे ती आवरली जाईल. थोडं आत्मपरीक्षण होईल. आईवडील अनुभवी असतात, त्रयस्थ दृष्टीनं ते पाहू शकतात, अनेकदा आपल्या लक्षात न आलेले आपले दोष ते आपल्याला दाखवून देतात त्यावेळी भले क्षणभर वाईट वाटलं तरी आपण दोष लक्षात घेऊन ते दूर कसे होतील याचा विचार करतो ना? बरं त्यातून आईवडिलांचा फायदा होण्यापेक्षा आपला स्वत:चाच फायदा होतो ना?

कारण असे स्वभावातले दोष म्हणजे - बेसावधता, चैन, उधळपट्टी, बडबड, धिसाडघाई - असे असंख्य दोष असतात. त्यांतला एखादा आपल्या अंगी असला व त्यांनी दाखवला तर तो लक्षात येऊन दूर करायची संधी आपल्याला मिळते. त्यामुळं आपणच अधिक निर्दोष होतो. आपलंच व्यक्तित्व अधिक आदर्श होतं, प्रगत होतं. अनेकदा असले उधळपट्टी सारखे दोष दूर होऊन वेळी आर्थिक, व्यावहारिक फायदाही होतो. मग याच पद्धतीनं आपण 'नावं ठेवण्याऱ्या' इतर निंदकांकडं पाहिलं तर तिथंही आपल्याला असेच फायदे होतील.

आता जो आपलं जीवन अधिक निर्दोष, आदर्श करायचा

प्रयत्न करतो आहे त्याचे उपकार मानणं, त्याच्याबद्दल आदर दाखवणं - अगदी महाराज म्हणतात तसा आईवडिलांसारखा आदर दाखवणं रास्त ठरतं.

त्याचबरोबर एरवी ज्या नकारात्मक गोष्टी आपल्याकडून घडल्या असत्या - उदा. राग येणं, निंदकांचे दोष हुडकणं - त्याही टळतील. परिणामी आपलंच मन शुद्ध राहील. अकारण जाणारी मन:शक्ती वाचेल व ती विधायक प्रगतीला उपयोगी पडेल.

त्यातूनही क्षणभर असं गृहीत धरू की, निंदकानं दाखवलेला एखादा दोष त्या प्रमाणात आपल्याकडं नसेल किंवा त्याचीच दृष्टी कलुषित असेल तरीही आपण त्याला आदर देऊन आत्मपरीक्षण करायला काय हरकत आहे ? त्याबद्दल खात्रीसाठी दुसऱ्या जवळच्या एखाद्या हितकर्त्याची मदतही घेऊन आपण आपलं परीक्षण निर्दोष करू शकू. दोष नसेल तर प्रश्नच नाही, प्रमाण कमीजास्त असेल तर दूर करायच्या प्रयत्नाला लागू. एकूण आपल्या व्यक्तित्वाच्या विकासाला, प्रगतीला फायदा आहेच. त्यातून एखादी निंदा पूर्वग्रहदूषित असेल तर ती काळाच्या कसोटीवर आपोआपच खोटी ठरते, फेकली जाते. त्यामुळं आपलं तसंही नुकसान होत नाही.

एकूण 'निंदकांना - नावं ठेवणाऱ्यांना''आईवडील समजणं' हा श्री कृष्णदास महाराजांचा या सुवचनातला सल्ला अनेक दृष्टीनं उपयोगी ठरणारा आहे, हे खरं !

*

२.

व्यावहारिक उत्सव क्षणिक परंतु नामोत्सव निरंतर चालवावा.

- श्री हनुमंत महाराज

धार्मिक व पारमार्थिक उत्सव हा माणसाच्या जीवनातला एक महत्त्वाचा भाग आहे. पण एखाद्या लग्नात जसा मूळ विधी तासाचा त्याला दोनच व्यक्ती व चार नातेवाईक लागतात. पण बाकीचा पसारा-पत्रिका, आमंत्रणं, कार्यालयं, पार्किंग, जेवणावळी, मेनू, आवडीनिवडी, आहेर, मानपान अशा असंख्य गोष्टीही रीतभात, हौस, चैन म्हणून, लौकिक म्हणून, इतर लोक करतात म्हणून कराव्या लागतात. अनेकदा अशा गोष्टी या मूळ -लग्नाच्या घटनेत-कशा शिरल्या हे सांगणंही अवघड जातं.मग मूळ लग्न वीस टक्के नि इतर अकारण पसारा मात्र ऐंशी टक्के असं सारं होऊन बसतं.

तीच अवस्था अशा धार्मिक व पारमार्थिक उत्सवांचीही होऊन बसते. जन्मकाळ किंवा पुण्यतिथी दोन मिनिटांची, उत्सव मात्र आठ दिवसांचा असं काहीतरी होतं. त्या मूळ घटनेचा ठसा मनावर उमटावा म्हणून खरं आधी आठवडाभर उत्सव ठेवलेला असतो. पण तो हळूहळू मूळ उद्दिष्टापासून इतका बाजूला जातो की त्याला लग्नकार्याची कळा येते. मग रोज पालख्या,सजावटी,रांगोळ्या,ताशे-वाजंत्री,चौघडे, सनया, प्रदक्षिणा अशी असंख्य भर पडत जाते. त्यात मग माणसं आपापल्या कुवतीप्रमाणं मनोरंजनंही आणतात आणि त्यात आपोआपच गुंतून जातात.

मग देवाच्या नावावर स्वत:चीच हौस सुरू होते. यात लोकांच्या उत्साहाला आवर घालणं म्हणजे जणू अपराधच मानला जातो. कारण 'ते दैवतच आपला उत्सव भव्य करून घेतं तर तुम्ही का आड येता?'असं म्हटलं म्हणजे खऱ्या भक्तांची तोंडंही बंद होतात.रोज देवाच्या नैवेद्याच्या निमित्तानं पंचपक्वान्नं हेही सारं ओघानंच आलं. त्यात पुन्हा देवाच्या किंवा गुरूंच्या आवडीनिवडी भक्त त्यांच्या स्वत:च्या आवडीनुसार ठरवीत जातात. तशी पूर्वापर प्रथा आहे म्हटलं की विचार करणाराही थांबतो. उगाच कुणाचा रोष कशाला ओढवून घ्या असं म्हणतो.

वास्तविक अशा वेळी त्या मूळ देवाचं-गुरूंचं अत्यंत साधं, सोपं जीवन, उपदेश जे या उत्सवात हरवून जातं, ते आधारासाठी काढून पाहिलं तरी त्यांना काय अपेक्षित असेल हे ठरवता येतं. तेवढ्या प्रमाणात व त्या पद्धतीनंच उत्सवही करता येतो. शिवाय परमार्थात पुढं जायला असा खरा उत्सवच जास्त उपयोगी असतो.

या साऱ्या उत्सवांच्या पार्श्वभूमीवर श्री हनुमंत महाराज यांच्या या वचनाचा भावार्थ दोन प्रकारचा आहे. पहिला व्यावहारिक आहे. भव्यदिव्य उत्सव साजरा करणाऱ्याला आर्थिक आणि मनुष्यबळाचं पाठबळ लागतं, तर तो उत्सव तसा जमेल. तेही जमलं, त्यानं थोडीफार परमार्थबुद्धी निर्माण झाली तरी उत्सव अखेर तात्कालिक, मर्यादित असतो. साहजिकच उत्सव संपला की माणसाची परमार्थबुद्धीही ओसरते. वास्तविक उत्सव मुळात ज्या देवाचं, गुरूंचं स्मरण वाढावं, दैनंदिन जीवनाला उपासनेचं वळण लागावं म्हणून केला जातो, ते उद्दिष्टच त्यात हरवतं. मग परिणामांच्या दृष्टीनं असे उत्सव क्षणिक ठरतात, आणखी एक वेगळा प्रपंच वाढवणारेच ठरतात.

श्री हनुमंत महाराज उलट सुचवतात की, असे उत्सव हे खरे

गौणच. कारण तेही तात्कालिक आणि त्यांचा परिणामही क्षणिक. म्हणूनखरा उत्सव नामाचा. त्यात फक्त नामस्मरण चालतं. तो मात्र सदासर्वकाळ चालणारा आणि परिणामानंही मनुष्याला अंतर्मुख, शुद्ध आणि सत्प्रवृत्त करणारा, भगवंताकडं नेणारा आहे.

आपण या दोन उत्सवांतला फरक पाहिला तर, श्री महाराजांचा मुद्दा अधिक स्पष्ट होईल. समजा एक आधी वर्णन केला तसा लोकप्रिय व्यावहारिक उत्सव आहे आणि दुसरा नामोत्सव आहे. पहिल्यात गर्दीची गरज आहे, दुसऱ्यात नाही. पहिल्यात पंचपक्वान्नांची गरज आहे, नामोत्सवात नाम घेणं शक्य व्हावं म्हणून उलट पक्वान्न लागतच नाही, वेळी अन्नसुद्धा थोडं कमीच लागेल. पहिल्यात सजावटी, पालख्या, मानपान लागतील तर दुसऱ्यात सारेच नाम घेतील त्यामुळं लहानमोठाही नाही, मानपान, रुसवेही नाहीत, पोकळ डौलही नाही. पहिल्यात मनोरंजनं तर दुसऱ्यात मनोरंजनं नाहीतच. फक्त लागेल तो नाम घेताना येणारा कंटाळवाणेपणा टाळण्यासाठी ब्रेक, फिरून येणं, साधं चहापान, देवदर्शन, एखादं सात्त्विक वाचन.

असे अनेक फरक या दोन उत्सवांत दिसतील. इतकंच काय, हे व्यावहारिक उत्सव एखाद्या आव्हानासारखे पार पाडल्यावर सर्व उत्सवी मंडळींना आपण कसा थाटात उत्सव केला याचा अनेकदा अहंकारच वाटतो. उत्सवात प्रचंड खर्चवेच होतो. इकडं नामोत्सवात मात्र नाम घेणारा अखेर एवढं नाम झालं ते देवाच्या कृपेनंच शक्य आहे अशा भूमिकेला येतो. कारण एरवीचा उत्सव प्रापंचिक ठेवणीचा असल्यानं मनही रमतं आणि पार पाडायला मदतही मिळते. पण नाम घेणं मनाच्या उलट आणि निरुपाधिक आहे. अशाही स्थितीत ते घडतं त्यामुळं तो शरणागतीला येतो. शिवाय निरुपाधिक नामाचा आनंद कळल्यानं पुढं प्रपंचातही हे नाम कसं टिकवता येईल याच्या चिंतनात

तो नामोत्सवातूनघरी जातो.

हे जाता जाता लक्षात घेणं योग्य होईल की, इथं नामोत्सव अशा वापरलेल्या शब्दातला उत्सव शब्द फक्त एकमेकांच्या सत्संगानं होऊ शकणाऱ्या नामासाठी समूहानं एकत्र येण्यापुरताच उत्सव आहे. इतर प्रापंचिक क्षणिक उत्सवांची छटाही या उत्सव शब्दाला नाही. त्यामुळं असा नामोत्सव करणाऱ्या व्यक्ती दोनही असतील किंवा शंभरही असतील. पण ते भगवंताच्या दिशेनं नुसत्या नामाच्या उत्सवात राहाण्यानं, इतर क्षणिक उत्सवांचे तोटे टाळून दोन पावलं पुढंच जातील.

दुसरीही एक अर्थछटा नामोत्सव शब्दाला आहे. आपल्या प्रत्येकाच्या ठिकाणी श्वासोच्छ्वासाचा एक उत्सवच निरंतर सुरू आहे. त्याबरोबरीनं जर आपल्याला अगदी श्वासावर नव्हे किंवा श्वासागणिक नव्हे, पण श्वासाची जाणीव ठेवून जास्तीत जास्त नाम रोज घेता आलं तर त्यात परमेश्वरानं दिलेल्या श्वासाचं खरं चीज आहे. हा उत्सव प्रत्येक माणसाच्या ठिकाणी निरंतर चालणारा आहे, अत्यंत निरुपाधिक आहे.

कधी एखाद्या सामूहिक, क्षणिक उत्सवातून ही प्रेरणा मिळेल त्यासाठी तो करावा, पण हा खरा निरंतर नामोत्सव आपापल्या ठिकाणी चालवण्याचं उद्दिष्ट मात्र असावं, ज्यानं आपापली जीवनंही भगवंतमय बनतील अन् प्रपंचही !

*

३.

तुम्ही काय करता आहात यापेक्षा तुम्ही काय करायचे थांबवले आहे त्याला महत्त्व आहे.

- श्री निसर्गदत्त महाराज

कर्मांची आणि माणसाची गाठ अतूट आहे, जन्माला आल्यावर घेतलेल्या पहिल्या श्वासापासून अंतिम श्वास सोडेपर्यंत. साहजिकच एवढ्या साठसत्तर वर्षांच्या कालावधीत अक्षरशः अगणित कामांचा डोंगर प्रत्येक माणसाकडून उभा होतो. त्यात पूर्ण व्यक्तिगत कर्मंही आली आणि सामूहिक कर्मांत त्यानं घेतलेला भागही आला.

पण अडचण अशी की, इतकं कार्यरत राहूनही बहुसंख्य लोकांचे प्रपंच अत्यंत निकृष्ट मनोवस्थेत संपतात. काही लोक त्याविषयी उदासीन राहून, ते तसंच असतं म्हणून स्वीकारतात, काही त्याचा विचारच करीत नाहीत, काही मरेपर्यंत कुठल्या ना कुठल्या कामात आपल्याला गुंतवून घेतात आणि या मूळ प्रश्नाला किंवा वस्तुस्थितीला सामोरं जाणंच टाळतात, काहींचं समर्थन असतं की, स्वतःच्या बाबतीत किंवा प्रपंचाच्या बाबतीत आपल्याकडून यापेक्षा वेगळं आणखी काय होणार?

जगात कर्मांनी काय होणार किंवा प्रपंचातही कर्मांनी कितीसं आदर्श किंवा आनंददायक चित्र निर्माण करता येईल, याच्या मर्यादा स्पष्टच आहेत.

अवतारी पुरुष जन्माला येऊन अलौकिक कार्य करून गेले, तरी ज्यांना उपयोग व्हायचा त्यांनाच झाला किंवा ज्यांनी उपयोग

करूनघ्यायचा ठरवला, त्यांच्या इच्छेनुसार त्यांच्यापुरती होणारी सुधारणा किंवा जीवनाची उत्कृष्ट अवस्था सोडली तरी इतर सर्व जगाची ठेवण किंवा प्रपंचाचा अपुरेपणा हा कायमच राहिला, असं दिसेल.

प्रश्न आहे तो व्यक्तिगत माणसांचा आणि त्यातही त्यांच्या मनोवस्थेचा. जग आणि प्रपंच कोणत्याही परिस्थितीत राहात असले, तरी त्या त्या माणसाला मात्र मनाच्या अत्यंत उन्नत, उत्कृष्ट किंबहुना दैवी वा मुक्त अवस्थेत याच देहात असताना किंवा देह त्यागताना पोचणं, जाणं हे मात्र शक्य आहे. किंबहुना असंख्य संतसत्पुरुष किंवा त्यांच्या उपदेशाप्रमाणं जगणाऱ्या, एरवी अगदी सामान्य असणाऱ्या माणसांनीसुद्धा हे प्रत्यक्ष करून दाखवलं आहे, हे मात्र फारच लक्षात घेण्यासारखं सत्य आहे.

हे त्यांना कसं साध्य झालं, याचं उत्तर अर्थातच त्यांच्या या 'कर्मव्यापारा'मध्येच आहे. कारण कर्मं त्यांनाही चुकलेली नाहीत. त्यांनी ती चुकवलेली किंवा टाळलेलीही नाहीत. फक्त त्यांची निवड बदललेली आहे, वेगळा विचार त्यासाठी जाणीवपूर्वक केलेला आहे, असं आढळेल. यासाठी कर्म कोणती निवडावी, कोणत्या हेतूनं करावी, कोणत्या कौशल्यानं करावी वगैरे सांगणारे महापुरुषांचे गीतेसारखे अलौकिक ग्रंथ अत्यंत सामान्य माणसालाही सहज उपलब्ध आहेत. त्यात यांची माहिती माणसाला मिळू शकते.

फक्त सामान्य माणसाची, वेळी काही मोठमोठ्या माणसांची जी या विषयात एक चुकण्याची जागा आहे, तिच्यावर हे संतवचन बोट ठेवतं आहे. प्रश्न असा येतो की, कुठल्याही विषयासाठी, ध्येयासाठी प्रयत्न करायचे म्हटलं म्हणजे आता आपण काय काय करायचं याचाच विचार सामान्यपणे माणसाच्या मनात येतो.

इतर विषयांच्या बाबतीत ते खरंही असेल. पण मनाच्या

शांत,उत्कृष्ट, आनंदी अवस्थेला जायला मात्र थोडा वेगळा विचार सुरुवातीलाच करावा लागतो.

माणसाच्या वाट्याला जी निकृष्ट, दु:खी व असफल अवस्था येते, ती काही विशिष्ट कर्म न केल्यामुळं येण्यापेक्षाही, बरीच चुकीची कर्मं केल्यामुळं आलेली असते. बरोबर किंवा चांगली कर्मं करणं हे योग्य रस्त्यानं चालण्यासारखं आहे.ते व्यवहारात अत्यंत गरजेचंच आहे, परमार्थात किंवा या आनंदप्रवासातही गरजेचंच आहे.

पण चुकीची कर्मं करणं, हे अनेक चुकीचे रस्ते, चुकीच्या दिशेनं चालण्यासारखं आहे. व्यवहारातल्या, प्रपंचातल्या मार्गात आणि या मार्गात फरक असा आहे की, एकदा माणसाला बरोबर रस्ता कळला की, त्या दिशेनं चालताना तो त्याचवेळी इतर चुकीचे रस्ते कधी चालत नसतो. त्यामुळं विशिष्ट प्रवासानं, काही काळानं तो ध्येय गाठू शकतो.

परमार्थात मात्र माणसाला बरोबर रस्ता कळला, तो रस्ता तो मनुष्य चालत असला, तरी त्याचवेळी त्याचे पूर्वीचे अनेक चुकीचे रस्तेही तो चालत राहू शकतो. परिणामी प्रगती तर नाहीच, अधोगतीही होऊ शकते. म्हणजे असं की, आनंदप्राप्तीसाठी तो देवदर्शनालाही नियमित जायला लागेल, नामस्मरण करायला लागेल, पण त्याचवेळी तो दुसऱ्यांविषयी पूर्वीप्रमाणेच तुलना करीत राहील, स्पर्धा करीत राहील, पैशाचे गैरव्यवहार करीत राहील, भ्रष्टाचारी राहील, अकारण संपत्ती स्थावर - जंगमाचे संचय करीत राहील.

म्हणून साधनेचा सात्त्विक मार्ग चालूनही पुन्हा अप्रगतच राहील. कारण नामानं, साधनेनं त्याला मिळालेलं सारं या अशा चुकीच्या वर्तनानं कधीच वाया गेलेलं असेल.

म्हणून श्री निसर्गदत्त आवर्जून सुचवतात की, ज्या ज्या चुकीच्यावर्तनांनी-स्पर्धा, असूया, मत्सर, लोभ-अशा गोष्टींनी आपण

अधोगतीला जातो, त्यातलं काय काय आपण करायचं थांबवलेलं आहे, याला फार महत्त्व आहे. नवीन काय काय करायचं ठरवलं आहे-भले ते कितीही चांगलं असो-त्यापेक्षा या चुकीच्या गोष्टी थांबवण्याला जास्त महत्त्व आहे. कारण चुकीच्या गोष्टी न थांबवण्यानं होणारं नुकसान फार मोठं आहे.

त्यातही एक मुद्दा जाता जाता लक्षात घेण्यासारखा आहे. उदाहरणानं पाहायचं झालं, तर मत्सरानं प्रपंचात व व्यवहारात होणारी हानी आपण समजून घेऊ शकू. अशा मत्सरानं मन धुमसत राहातं, अस्वस्थ राहातं. मत्सर ज्या व्यक्तीविषयी असेल त्या व्यक्तीभोवतीच आपले विचार घोटाळत राहातात. हे विचार हळूहळू विघातक स्वरूप धारण करतात.

त्यात मनुष्य एका बाजूनं आपले दोष, उणिवा, असमर्थता, प्रयत्नांची कमतरता यांच्यावर पांघरूण घालतो. त्यांचं जोरदार समर्थन मनानं करीत राहातो. तर ज्या व्यक्ती प्रगती करून पुढं गेल्या त्यांच्यातले दोष हुडकत राहातो. त्यांच्या चुका शोधीत राहातो. त्यांच्याबद्दल कुठं काही वाईट ऐकायला मिळतं आहे का ते शोधतो. त्यांच्या निंदेची संधी कुठं मिळते का याचे नकळत प्रयत्न करीत राहातो. अशा मत्सरानं अर्थातच दुसऱ्यांपेक्षा स्वतःचंच नुकसान होत असतं, हे वेगळं सांगायला नको.

माणसानं परमार्थ करायचा ठरवला, साधन करायचं ठरवलं, ते तो करीतही असला आणि तरी त्यानं जर मत्सर सोडायचं किंवा थांबवायचं ठरवलं नाही, तर प्रपंचातलं काय ते मनाचं नुकसान मत्सरानं होणारच असतं. त्यात परमार्थातही तो त्याच्या बरोबरच्या साधनी माणसांचा मत्सर करू लागला तर त्याचं होणारं मानसिक नुकसान अधिक मोठं असतं.

याचं कारण परमार्थ मुळात मानसिक पातळीवरचा असल्यानं

नुकसान करण्याची या नको असलेल्या गोष्टींची क्षमता प्रापंचिक बाबींपेक्षापरमार्थाच्या वाटेत जास्त असते. म्हणून हे पाहाण्याची सदैव गरज आहे की, ज्या चुकीच्या कृतींमुळं आपलं नुकसान झालं त्यांतल्या किती थांबवायच्या आपण ठरवल्या आहेत, नव्हे प्रत्यक्ष थांबवल्या आहेत हे नवीन काय साधन करतो आहोत यापेक्षा अधिक महत्त्वाचं आहे.

याचा फायदा असा की, मग चुकीच्या कर्मांवर जाणारी शारीरिक, मानसिक ताकत, वेळ वाचतो, नुकसान तर थांबतंच, पण जे काही साधनेनं मिळवू ते वाया जात नाही, साठत राहातं.

योग्य कृती करायला मिळणारी शक्ती, वेळ याही गोष्टी वाढतात. परिणामत: ध्येय लवकर जवळ येतं.

*

४.

प्राप्त झाले जरी धन ।
पाहिजे सांभाळण्या ज्ञान ।।

- श्री विश्वनाथ महाराज

मनुष्याची अविरत, आयुष्यभर धडपड सुरू असते ती काही ना काही गरजेच्या गोष्टी मिळवण्यासाठी. प्रथम पोटाला अन्नपाणी मिळवण्यासाठी धडपडणारा माणूस पुढं वस्त्रप्रावरणांसाठी धडपडतो. त्याही गरजा भागल्या की, घरदारासाठी कष्ट करतो.प्राथमिक गरजा पुऱ्या झाल्या की, मग हौसेच्या-छंदाच्या-आवडीच्या गोष्टींसाठी धडपडतो. या साऱ्यांत पैसा हा तर मिळकतींचा केंद्रबिंदूच असतो. त्या साऱ्या गरजा पुऱ्या होताच मग लौकिक, मानमरातब, लोकसंग्रह अशा अनेक गरजांसाठी धडपड सुरू राहाते.

ज्याच्या त्याच्या धडपडीच्या, कुवतीच्या, परिस्थितीच्या, साऱ्या प्रसंगांच्या वेळच्या वृत्तीबद्दलचा असतो. उदाहरणादाखल 'घर' हे एक धन घेऊ. गृहधन मिळालं, तरी व्यवहारानं त्यात नुसतं राहाणं हे त्याचं सार्थक नसतं. घर 'वापरता' यावं लागतं. नुसतं स्वतःच्या गरजांसाठीच नव्हे, तर आपल्या सर्वांच्या सोयी-गैरसोयी लक्षात घेऊन त्यांच्यासाठी, आल्यागेल्यांसाठी, त्याची नित्य देखरेख, स्वच्छता, सौंदर्य, टापटीप, संरक्षण, ते एक मंदिर समजून त्यात त्या पद्धतीनं राहाणं-अशा अनेक बाबी माणसाला आल्या तर त्याला घर सांभाळता आलं असं म्हणता येईल. अखेर हेच घर 'बांधल्याचा अहंकार' न होण्यापासून 'अनेकांच्याकृपे'नं साकारल्याच्या कृतज्ञ

कृतिशील जाणिवेत सांभाळता आलं तर ते माणसाला समाधानालाही उपयोगी पडू शकतं. याला खरं आदर्श घर सांभाळणं म्हणावं लागेल. नुसतं घर मिळवण्यापेक्षा हे महत्त्वाचं व अवघड आहे.

जी अवस्था प्राप्त झालेल्या घराची तीच मिळवलेल्या किंवा प्राप्त झालेल्या सर्व प्रकारच्या 'धनाची' असते. ते कसं सांभाळावं याचं ज्ञान जर वेळीच प्राप्त झालं नाही, तर याच मिळकती 'समाधाना'च्या गावी नेण्याऐवजी स्वत:च्या कर्तृत्वाचे फोल अहंकार, इतरांविषयी तुच्छता, मोठेपणा व बुद्धिमत्तेच्या कौतुकाचा - विशेषत: इतरांना दाखवण्याचा विषय, घरातल्या अन्य घटकांविषयी बेफिकिरी, मदत करणाऱ्यांविषयी बेसावध कृतघ्नता - असल्या 'चोराच्या आळंदीला'ही याच मिळकती घेऊन जाताना दिसतात.

म्हणून स्वकष्टानं प्राप्त होवो, वडिलोपार्जित असो, प्रसंगोपात प्राप्त झालेलं असो कुठलंही धन, मग ते स्थावर,जंगम, ज्ञान, पैसा, वस्तू कोणत्याही स्वरूपाचं असो ते कसं सांभाळावं याचं ज्ञानही मिळवणं तितकंच आवश्यक आहे. अन्यथा तीच मिळकत अज्ञानी बेसावध माणसाच्या हातात पडली तर मद, मत्सर, लोभ, असूया, अहंकार असल्या चोरांकडून हडप होण्याची दाट शक्यता असते. तसं झाल्यास असली 'धनप्राप्ती' उपयोगाऐवजी उपद्रवाला व त्या त्या प्राप्तकर्त्याच्या नुकसानीलाच कारणीभूत ठरताना आपल्याला दिसेल.

जसं ज्ञानधन सांभाळायला नम्रतेचं ज्ञान लागतं, नाहीतर लोकांना उपद्रवी ठरणारा 'अहंकारी ज्ञानी' तयार होतो, मग त्याच्यापेक्षा निरहंकार अडाणी बरा म्हणायची वेळ येते ! जी गोष्ट धनांच्या बाबतीत तीच गोष्ट गुरूंकडून मिळालेल्या उपदेशाच्या, बोधाच्या धनाची आहे. स्वत:चा उद्धार करून घ्यायला अत्यंत मोलाचा, गरजेचा असलेला असा बोधखूप पुण्याईनं कानी पडतो. तो टिकवून ठेवणं, स्मरण करणं, त्याचं सदैव मनन करणं, आचरण करणं

- हे तो बोध सांभाळायला लागणारं 'ज्ञान' आहे.

ते नसलं तर केवळ आपण कुणा मोठ्या गुरूचे शिष्य आहोत हे सांगण्याचा अहंकार व तो उपदेश लोकांना दाखवीत सुटण्याचा किंवा लोकांना तसा उपदेश-प्रवचनं करीत सुटण्याचा विषय झाला तर बोधधन मिळूनही, प्राप्त झालेलं धन सांभाळण्याचं ज्ञान न मिळाल्यानं, माणसाचं नुकसान होण्याचीच शक्यता जास्ती. हीच गोष्ट अधिक उच्च पातळीवर भगवंताच्या एखाद्या अनुभवाच्या, साक्षात्काराच्या क्षणाच्या बाबतीत होऊ शकते, एवढं म्हटलं तरी पुरे!

म्हणून विश्वनाथ महाराजांचा मोलाचा सल्ला वेळीच लक्षात ठेवून लौकिकातलं, पारलौकिक विषयातलं कुठलंही धन योग्य प्रयत्नांनी अवश्य मिळवावं, पण त्याचबरोबर त्याला साजेसं, पुरेसं असं ते धन सांभाळण्याचं 'ज्ञान'ही आवर्जून मिळवावं, हे स्वत:ला व इतरांनाही हिताचं ठरेल.

*

५.

उन्हाळा जाऊन पावसाळा येणे यात आपला पराक्रम तो कसला ?

- श्री प्रल्हाद महाराज

प्रापंचिक माणसं कुठं एकत्र आली, त्यातही ती प्रौढ असली, बरेच वर्षांनी एकत्र भेटलेली असली म्हणजे त्यांच्या गप्पा ऐकाव्यात. असं आढळून येईल की, आपण किती अडचणी असताना नोकरी केली, आपण कसे दिवस काढले, पैसा कसा साठवला, किती अडथळे आले तरी घर कसं बांधलं, सोयी कशा केल्या, मुलांना शिक्षणं कशी दिली, त्यांना आपल्या पायावर कसं उभं केलं-अशा कर्तृत्वाच्या असंख्य कहाण्या ऐकवायला ती माणसं किती उत्सुक असतात, ते पाहात राहावं असंच असतं. कुणाला सांगण्याची कला थोडी अधिक असते, कुणाला थोडी कमी. पण आतून उर्मीत काही फरक नसतो. एखादा सांगणाराच एवढा पट्टीचा असतो की, दुसऱ्या एखाद्याला सांगायची संधीच मिळत नाही एवढाच फरक. पण कर्तृत्वाच्या, अहंकाराच्या भ्रमात अन् स्वत:च्या कौतुकात कुणी कमी असतो, असं वाटत नाही.

क्षणभर असा विचार करू की, आपल्याच मागच्या चार पिढ्या पाहिल्या,अगदी पूर्वजांचा-पायी, घोड्यावरून, पालखीतून फिरणाऱ्यांचा काळ आठवला किंवा आपल्याच काळातल्या आजूबाजूच्या शंभर लोकांचे प्रपंच पाहिले, तरी प्रत्येकाच्या प्रपंचात या गोष्टी घडलेल्या दिसतातच. तपशीलात काही थोडा फरक असेल,

पण त्यांनीही मुलाबाळांचं केलं,आपापल्या काळानुसार उद्योगधंदे केले, पैसा साठवला, भविष्याच्या तरतुदी केल्या, घरं-वाडे बांधले, आजच्या काळात काही फ्लॅट, प्लॉट घेतले असतील पण यापेक्षा वेगळं काही केलं, असं म्हणण्यासारखं आयुष्य किती लोकांचं असेल? किंबहुना या सामान्य जीवनापेक्षा वेगळं काही जीवन असू शकेल, याची कल्पना तरी किती लोकांना असेल ?

अनेक सामान्य जीवन जगणाऱ्यांना 'असामान्य' जीवनाची कल्पना तर नसतेच, पण त्याहीपुढं जाऊन त्यांच्या स्वत:च्याच सामान्य जीवनाला ते 'असामान्य' जीवन समजतात. त्यांच्या या घरदार-मुलंबाळं-इस्टेटी अशा 'असामान्य' आयुष्याचा इतरांनी आदर्श घ्यावा, आपण जणू काही अलौकिक जीवनच जगलो आहोत, हे जगाच्या अजून लक्षात आलेलं नाही, ते जगानं लक्षात घ्यावं,आपला फोटो लावावा, कौतुक करावं, आपल्याकडून जगण्याविषयी मार्गदर्शन घ्यावं असंच अनेक सामान्य, संकुचित जीवन जगणाऱ्यांना वाटतं.

अशांनी हे लक्षात घेण्याची गरज आहे की, सामान्यपणे या गोष्टी अनेकांच्या आयुष्यात पिढ्यान्पिढ्या घडत आलेल्या असतात. त्यात वेगळं, अपूर्वाईचं असं काही जीवन नसून उन्हाळा जाऊन पावसाळा यावा आणि यात आपलं आवर्जून सांगावं असं काही कर्तृत्व नसावं तशी आपली अवस्था आहे. निसर्गक्रमानं या गोष्टीत थोडंसं सावध राहिलं तरी त्या घडत असतात. त्यात मिरवण्यासारखं तर काहीच नाही. म्हणून तर अनेकदा कर्ते पुरुष जातात, पण कुठला प्रपंच अडत नाही. उलट ते असताना काय शिकवतील अशी मुलं शिकतात, जबाबदारीनं वागतात, आयुष्याची घडी व्यवस्थित बसवतात. त्यामुळं प्रापंचिक गोष्टी झाल्या हे चांगलं असलं तरी त्यात फार मोठा 'पराक्रम वाटण्यासारखं काही नाही, सांगण्यासारखं तर

नाहीच नाही' हे ओळखून असावं.

जे जगासाठी जगले, स्वतः उपाशी राहून दुसऱ्याची दुःखं दूरकरण्यासाठी निरपेक्षपणे राबले, जे निसर्गाची रहस्यं उलगडून जगाचं जीवन सुखी करण्यात स्वतःच्या सुखाला विसरले, ज्यांनी मनुष्यपणातलं सोनं असा जो भगवंत तो आपलासा केला, मिळवला-अशांच्या आयुष्याकडं पाहिलं तर आपण सावध होऊ आणि 'अलौकिक' किंवा 'आदर्श' मानवी जीवन कोणतं याची आपल्याला थोडी कल्पना येईल व खऱ्या पराक्रमाचं दालनही उघडेल.

मग निसर्गक्रमानं घडलेल्या सामान्य घटनांचं कौतुक करीत राहाण्यापेक्षा निसर्गक्रमानं मिळालेल्या क्षमतांचा खरा वापर व पराक्रम निसर्गाला किंवा परमेश्वराला आपल्याकडून कोणता अपेक्षित आहे, तो शोधण्यासाठी माणूस सुरुवातीपासूनच सावध राहील. असे खरे मानवी पराक्रम - भले ते स्वतः मुक्त होण्याचे, स्वतःसाठी प्रकाश शोधून त्या प्रकाशात इतरांची जीवनं उजळण्याचे असोत वा ज्याच्या त्याच्या क्षमतेनुसार अन्य काही असोत-ते पराक्रम करण्यासाठी तो सुरुवातीपासूनच दक्ष राहील.

तसं दक्ष राहाण्याचं, ते करण्याचं स्वातंत्र्य व सामर्थ्य तर निसर्गानं त्याला अगत्यानं आपली विशेष लेकरं म्हणून अवश्य दिलं आहे, त्याचा वापर होईल व सार्थकही !

*

६.

चांगुलपण आणि प्रेम यांच्याशिवाय आपण खऱ्या अर्थाने सुशिक्षित होत नाही.

- श्री जे. कृष्णमूर्ती

एक छोटासा पण कुणालाही करता येण्यासारखा प्रयोग आहे. आपल्या आजूबाजूला इतकी ओळखीची माणसं आहेत.सहज नुसत्या नावांची यादी करायची म्हटली तर पाच-दहा पानं भरणं शक्य आहे. त्यानंतर दुसरा प्रयोग म्हणून आपल्या ओळखीच्या शिकलेल्या शंभर माणसांची यादी करायची ठरवावी. एखादा अपवाद सोडला तर जी जी ओळखीची म्हणून नावं आठवतात, ती सारी 'शिकलेली'च माणसं आहेत, असं लक्षात येईल. त्यातही अगदी सहीपुरतं नव्हे, तर चांगली सुशिक्षित, पदवीधर वगैरे आहेत. त्यामुळं ही दुसरी सुशिक्षित माणसांची यादीही लवकर पुरी होऊ शकेल.

लगेचच तिसरी एक यादी करायला घ्यावी. ज्यांच्या अंगी चांगुलपण आहे, जी'चांगली' माणसं आहेत असं आपल्याला मनापासून वाटतं अशा शंभर माणसांची यादी करायला लागावं. मग अडखळायला सुरुवात होते. ज्यांना सर्वच माणसं चांगली वाटतात असे थोर लोक किंवा चांगुलपण ओळखू न शकणारे भोळे लोक सोडले, तर कुणालाही ही यादी पुरी करणं कठीण आहे, असं लक्षात येईल. त्याहीपेक्षा कठीण अवस्था 'प्रेमळ' किंवा 'शुद्ध प्रेम' करणाऱ्या माणसांची यादी केल्यास होते हे लक्षात येईल.

आता शिकलेली म्हटल्यावर इतकी माणसं इतक्या सहजपणे

आठवावी आणि तेच त्यातली चांगली किंवा प्रेमळ माणसं निवडायची म्हटल्यावर अशी अडचण का यावी? याचं कारण असं की, शिक्षणानं 'नुसत्या माणसा'चा 'चांगला माणूस' होणं किंवा 'निरपेक्ष, शुद्ध, हितकारक, प्रेम करणारा माणूस' होणं असा काही संबंधच जोडणं आता कठीण झालं आहे. किंबहुना त्याचा नि शिक्षणाचा काय संबंध आहे असंच एखाद्याला वाटेल. इतकंच काय 'शिकलेला' म्हणजे 'शिक्षित' एवढाच अर्थ आता उरला आहे. त्यातही सुशिक्षित म्हणजे सर्वसाधारणपणे 'अधिक शिकलेला' असा झाला आहे, हेही लक्षात घेण्यासारखं आहे.

या ठिकाणी 'शिक्षण' म्हणजे विशिष्ट विद्याशाखा, शास्त्रशाखा, कलाशाखा एवढंच अपेक्षित नाही, तर तिथंपासून अगदी धर्म-अध्यात्म शिक्षणसुद्धा विचारात घेतलं तरी चालेल. कारण आपला अनुभव असं सांगेल की, जितका एखाद्या लौकिक विद्याशाखेचा पदवीधर झालेला माणूस त्याच्या शास्त्रात पारंगत-सुशिक्षित असूनही माणूस म्हणून 'चांगला' माणूस नसू शकतो, तितकाच एखादा धर्मशास्त्री किंवा आध्यात्मिक म्हणवला जाणारा माणूस त्याच्या धर्मविषयात किंवा अध्यात्मविषयात तज्ज्ञ असून, उत्तम कीर्तनप्रवचनकार असूनही माणूस म्हणून 'चांगला' माणूस नसू शकतो.

त्यामुळं तथाकथित सुशिक्षितपणाची ही अडचण वाटते तेवढी मर्यादित नाही, सोपी नाही, व्यापक आहे, सार्वत्रिक आहे. व्यक्तिगत व सामाजिक स्वास्थ्य आणि प्रगतीच्या दृष्टीनं ती अडचण सुटणंही निकडीचं आहे. म्हणूनच 'खऱ्या अर्थानं' सुशिक्षित म्हणजे काय ते स्पष्ट करण्याची वेळ सत्पुरुषांना आली आहे. कारण नुसत्या शिक्षणाचा सुकाळ झाला तरी त्या मानानं चांगुलपणाचा सत्कार्यांचा, व्यक्तिगत किंवा सामाजिक, स्वास्थ्याचा, सुजाणतेचा, परिपक्वतेचा

सुकाळ होण्याऐवजी अभावच वाढत चाललेला आढळेल. बाहेरच्या जगात नि:स्वार्थीपण, निर्लोभता, नम्रता, शांती, प्रेम, परस्पर कदर, कृतिशील आदर यांची उलट अवहेलना, चेष्टा होताना दिसते. स्वार्थाला, अहंकाराला, अपरिमित लोभाला, पैशाला प्रतिष्ठा मिळताना दिसते. याचा दोष कुणा व्यक्तीपेक्षा मूळ शिक्षणात व त्याकडं बघण्याच्या दृष्टिकोनात आहे. विशिष्ट विषयांची अद्ययावत किंवा सखोल माहिती म्हणजे शिक्षण नव्हे.

असा चांगला किंवा जाणतं-शुद्ध प्रेम करू शकणारा माणूस घडवण्याची जबाबदारी शिक्षणाचीच आहे. त्याच बरोबरीनं ती जबाबदारी तशा शिक्षणालाच 'शिक्षण' मानणाऱ्यांचीही आहे. त्यासाठी अशा 'खऱ्या सुशिक्षितां'नाच आदर देण्याची, त्यांची कदर करण्याची गरज आहे. आपणही खऱ्या अर्थानं सुशिक्षित होऊ का, असा विचार व प्रयत्न करण्याची निकड आहे. कारण आपलं आणि समाजाचंही स्वास्थ्य त्यावर अवलंबून आहे.

त्यासाठी कृष्णमूर्ती म्हणतात त्यानुसार खरं शिक्षण कोणतं आणि खरं सुशिक्षित कुणाला म्हणता येईल, याचा आपण आपल्या मनाशी तरी विचार करू या का ?

*

७.

आपणाकडून दुराचरण झाल्याशिवाय एक साधा काटाही मोडणार नाही.

- श्री निंबरगी महाराज

माणसाच्या वाट्याला दु:खं येतात. त्या दु:खांबद्दल त्याची तक्रार असते. अनेकदा ही तक्रार, माझा काही दोष नसताना मला त्रास किंवा दु:खं सहन करावी लागतात, याबद्दल जास्त करून असते. विशेषत: परिस्थिती, इतर कुणी हितशत्रू, स्पर्धा करणारी माणसं अशा कुणामुळं तरी हे दु:ख मला सहन करावं लागतं, असंही अनेक जण सांगताना दिसतात. निदान त्यांची स्वत:ची तरी तशी ठाम समजूत असते. इतरांनाही ते हे पटवून देताना आढळतात. अशा तऱ्हेनं दु:खाचं कारण दुसरा कुणीतरी आहे हे ठरवण्यात त्यांना काय आनंद मिळत असेल ते असो, त्यामुळं दु:ख कमीही होत नाही आणि दु:खाचं कारणही दूर होत नाही. परिणामी मनुष्य दु:खात जगतो आणि दु:खात मरतो. अशा सर्वांना सावध करणारं हे वचन आहे.

निंबरगी महाराज म्हणतात की, दु:ख दुसऱ्या कुणाच्यामुळं आपल्या वाट्याला येतं, ही केवळ आपली समजूत किंवा पळवाट आहे. जसं माझ्या योग्य कष्टाचं फळ म्हणून माझ्या वाट्याला यश किंवा सुख येतं, तसंच माझ्या अयोग्य किंवा चुकीच्या कृतींमुळं माझ्या वाट्याला दु:ख येत असतं. माणसं, त्याची कर्मं, त्यांचे परिणाम, परिणाम होण्याच्या वेळा, परिणामांची तीव्रता - या साऱ्या गोष्टी प्रचंड आहेत, अवाढव्यआहेत, अनेकदा मानवी बुद्धीच्या व

अर्थ लावण्याच्या कुवतीच्या बाहेर आहेत, असं दिसलं तरीही त्या व्यवस्थेमध्ये कुठंही गोंधळ, भोंगळपणा नाही. तिथला कार्यकारण भाव आपण थक्क होऊ इतक्या अचूकतेनं काम करीत असतो. सारे दुवे आणि संबंध आपल्याला स्पष्ट होत नसले, तरी ते नसतात, असं नाही.

इथं म्हटल्याप्रमाणं दुराचरण याचा अर्थ आजच्या प्रचलित अर्थाप्रमाणं 'दुराचरण' असाही होत असला तरीही त्याचा खरा व व्यापक अर्थ चुकीची कृती इथंपासून कृतीतली चूक इथंपर्यंत सर्व आहे. तसंच काटा मोडणं याचा अर्थ दुःख सोसावं लागणं असा आहे.

इथलंच उदाहरण पाहायचं झालं, तर रस्त्यानं जाताना पायात काटा टोचल्याचा अनेकांना अनुभव असेल. अशा वेळी 'लोक रस्त्यात असे कसे काटे टाकतात, काटे टाकणाऱ्यांना शिक्षा झाली पाहिजे, रस्त्याकडेचे दिवे बंद असतात, ग्रामपंचायतीचं किंवा नगरपालिकेचं दिवे बसवण्याकडं, नागरिकांकडं लक्ष नाही' अशा अनेक प्रतिक्रिया आपण दिल्या असतील, लोकांनी देताना आपण ऐकल्या असतील. यात आपल्या 'दुराचरणाचा' कुठंच संबंध येत नाही असंही वाटण्याची शक्यता आहे.

चुकीची कृती या अर्थानं पाहिलं तर मी अंधारात जाताना माझ्या बरोबर बॅटरी नव्हती, ती नसेल तर विशेषतः सावधगिरीनं चालण्याची जबाबदारी माझी होती. माझा पाय काट्यावर दुसऱ्या कुणी टाकलेला नाही, त्यामुळं मी सावध असतो तर मी तो वाचवू शकलो असतो.

या आणि अशा अनेक चुकीच्या कृती किंवा कृतीतल्या चुका आपल्या लक्षात येतील. अशा वेळी आपली चूक लक्षात आली, तर दुःखाची तीव्रता आपोआप कमी होते. दुसऱ्यांना दोष देणं टळतं व

त्यात जाणारा वेळ वाचतो. त्यातून निर्माण होणारे इतरांचे गैरसमज, बेजबाबदार संवाद व वेळ टळतो.

अधिक बारकाईनं विचार करणाऱ्याला कदाचित हेही आठवू शकेल की, आपण कधी तरी दुसऱ्याला अशाच तऱ्हेचं दु:ख देऊ शकणारी काटा-पिन-टाचणी, केळ्याची साल किंवा असं काही बेसावधतेनं रस्त्यावर टाकलेलं असतं, मग तर तक्रार आणखीच कमी होईल व इथून पुढं तरी वर्तनाला सावध, विचारी व विधायक दिशा मिळेल.

या वचनात अर्थातच असं अभिप्रेत नाही की, दुसऱ्या कुणाची चूक कुठं नसतेच. तीही काही प्रमाणात असली तरी त्याचा विचार करण्याआधी स्वत:ची जबाबदारी ओळखण्याची सवय आपल्याला लागणं हे अधिक गरजेचं आहे. हे व्यक्तीला विकासासाठी व समाजाला सामाजिक जाणिवेच्या वाढीसाठी उपयुक्त ठरतं.

या वचनाच्या चिंतनानं आजचा मोलाचा वेळ योग्य कामी लागणं, सहनशीलता वाढणं आणि दु:खावरचा जो खरा उपाय - 'आजचं विवेकपूर्ण आचरण' - तोही घडू शकेल.

*

८.

सत्कर्म हा 'उपाय' आहे, 'उद्देश' नाही.

- श्री रामकृष्ण परमहंस

माणसाला कर्मं करीत राहाण्याला पर्याय नाही. कोणती कर्मं करावीत व कोणत्या भूमिकेनं ती करावीत हे स्वातंत्र्य मात्र त्याला आहे. सामान्य माणूस हा विचारच करीत नाही ही गोष्ट वेगळी. पण विचार करणाऱ्याच्या हे लक्षात येऊ शकेल की, समोर आली म्हणून कर्मं करीत सुटणं म्हणजे कोणतीही योजना, प्लॅन, सामानसाहित्य, मनुष्यबळ, कायदाकानू, सोयगैरसोय आदी पर्यायांचा विचार न करता हाती सापडेल त्या त्या वेळेला वाटेल, सुचेल तसं घर बांधीत जाण्यातला प्रकार आहे. अशा बांधकामांचं पुढं काय होतं, ते किती अडचणीत, नुकसानीत व गैरसोयीत जातं हे आपण पाहातोच.

तीच अवस्था विचार न करता कर्मं करीत जाणाऱ्यांची आहे. कर्मांच्या बाबतीत तर ती फारच आहे, कारण एकवेळ घर पाडून दुसरं उभं करता येईल, पण कर्मांचे सूक्ष्म लेप -चित्तावरचे परिणाम-संस्कार पुसणं कठीण जातं. शिवाय मूळच्या अशा मनाच्या, प्रपंचाच्या, देहसुखाच्या, दंभाच्या सवयीनं माणूस नकळत त्या त्या पद्धतींची कर्मं करीत सुटतो. म्हणून तर स्वभावानुसार बरीच माणसं तामस-राजस कर्मं सहजपणे करीत जातात. सात्त्विक कर्मं प्रयत्नपूर्वक शिकावी व कटाक्षानं करावी लागतात.

त्यात खरी अडचण आहे ती पुढंच आहे. कर्मं हे शेवटी वाटेतलं स्टेशनच आहे.खरे मुक्काम देवपण-शांती-समाधान-नित्य

आनंद-मोक्ष हे आहेत. कर्मांनी मनुष्य तिथं पोचण्याऐवजी बेसावध कर्मांनी या साऱ्यांपासून दूर-अशांती, दु:ख अशा चुकीच्या ठिकाणी येऊन पोचतो.

त्यामुळं विचारपूर्वक कर्मं करणारे अशी तामस कर्मं उदा. दुसऱ्यांना दु:खउत्पन्न करणारी, समाजाचं नुकसान करणारी व्यक्तिगत स्वार्थाची-अशी कर्मं टाळतात. राजस कर्मं - जी स्वत:बरोबर इतरांचाही काही फायदा करून देतात, सतत माणसाला गुंतवून ठेवतात-अशी कर्मं प्रमाणात ठेवतात आणि सात्त्विक कर्मं जी केवळ शुद्ध, निरपेक्ष, दुसऱ्यांचं कल्याण साधणारी, नि:स्वार्थीपणाची, देवभक्तीची आहेत, अशी कर्मं आवर्जून करण्याचा प्रयत्न करतात. अशा कर्मांनी माणसाच्या आयुष्याला विधायक दिशा जरूर मिळते हे खरंच आहे.

अशा सात्त्विक कर्मं करणाऱ्याबद्दल आदर राखूनही श्री रामकृष्णांनी केलेला हितकारक बोध लक्षात घ्यावा असा आहे. तीर्थं, व्रतं, समाजसेवा, यात्रा, समाधी-मठमंदिरं यांची उभारणी, त्यांची व्यवस्थापनं, दानधर्मं, पाणपोया अशी असंख्य सात्त्विक कर्मं ही चांगली असली तरी तीसुद्धा अखेर कर्मंच आहेत. त्यातल्या त्यात अशी कर्मं हा तामस किंवा राजस कर्मांचे दुष्परिणाम टाळण्याचा उपाय आहे. त्यामुळं इतरांचंही भलं होतं, हेही खरं.

पण सात्त्विक कर्मं हा शेवट नाही. कारण सात्त्विक कर्मांतसुद्धा 'अहंकारा'चा धोका इतर कर्मांपेक्षाही सर्वांत जास्त आहे. दुष्कर्म एकवेळ माणूस मिरवणार नाही, टाकायचा प्रयत्न करील, विसरायचा प्रयत्न करील. पण सात्त्विक कामं लक्षात तर ठेवीलच, पण इतरांच्या लक्षात आणून देऊन मोठेपण मिरवायचा प्रयत्न करील.

या दृष्टीनं पाहिलं तर 'शांती, समाधान' गाठायला ती उपयोगी पडतीलच, याची खात्री नाही. कारण सात्त्विक कर्मं झाली

तरी ती 'साधनं'चआहेत, उपाय आहेत, 'साध्य' किंवा 'उद्देश' नाहीत. त्यातून निरहंकार होता आलं, तर 'भगवंत' हे 'साध्य' गाठता येईल. नाहीतर गळ्यातली जड वस्तू दगड असली काय आणि सोन्याचा गोळा असला काय - दिसायला फरक असला तरी बुडवायला सारखाच असतो.

याचा अर्थ सत्कर्मं करू नयेत असा नक्कीच नाही. तो तर उत्तम 'उपाय'च आहे. तो करणं भागही आहे, पण त्यातला अहंकार जो अत्यंत फसवा व सूक्ष्मतर आहे, तो टाळता आला आणि ती सारी सत्कर्मं भगवंताच्या कृपेनं झाली याची ज्वलंत जाणीव निरंतर टिकवता आली तर त्या उपायाचा 'अपाय' न होता तो भगवंतप्राप्तीचा खरा मित्र ठरू शकेल हे स्पष्ट होईल.

फक्त त्यासाठी हे सारं पूज्य रामकृष्ण म्हणतात तसं सावधगिरीनं केलं तर शक्य होईल.

*

९.

आपल्याला ज्याचा अर्थ कळतो अशी स्तोत्रे म्हणावीत.

- स्वामी रामतीर्थ

खरं तर माणसाच्या तरी प्रत्येक कृतीला अर्थ असावा. कारण एकतर विचार करून, हेतूपूर्वक, दूरगामी परिणाम लक्षात घेऊन कृती करण्याची क्षमता माणसात आहे. अशा अर्थपूर्ण कृतींमुळं स्वत:च्याच नव्हे तर घराच्या, समाजाच्या आयुष्यालाही अधिक उपयोगिता येते, त्याचा दर्जा विलक्षण वाढतो. विचारपूर्वक किंवा अर्थ असणाऱ्या कृती करणं म्हणजे काही केवळ गंभीर,नीरस, कंटाळवाणं, वेळखाऊ, संथ असं जीवन जगणं, असा अर्थ मात्र इथं नक्कीच अभिप्रेत नाही. निखळ मनोरंजन, सात्त्विक करमणूक, निर्भेळ आनंद इथंपासून अगदी मानवी आयुष्याचं सार्थक करण्यापर्यंतच्या सर्व कृती 'अर्थपूर्ण' कृतीच होत.

माणसाच्या कृतींना अर्थ असला पाहिजे असं म्हणण्याचं दुसरं कारण असं की, माणसाचं आयुष्य तसं खूप मोलाचं, मर्यादित आणि अगदी पुरवून वापरण्यासारखी गोष्ट आहे. निरर्थक कृती करीत दवडण्याएवढं ते स्वस्त किंवा भरपूर नाही. मृत्यूची, कोणत्याही कारणांनी कृतींची क्षमता नाहीशी होण्याची, कोणत्याही प्रकारची विकलता येण्याची तलवार माणसाच्या डोक्यावर सारखी टांगती ठेवलेली आहे.

त्यामुळं ज्या काही कृती-मग त्या माणसाच्या आयुष्यातल्या

कुठल्याही प्रकारच्या क्षेत्रातल्या असोत, आधी अर्थपूर्ण कशा होतील आणि नंतर अधिकाधिक अर्थपूर्ण कशा होतील याचा त्यानं नित्य शोध घेणं त्याच्याच फायद्याचं आहे.

भगवंताची स्तुतिस्तोत्रं म्हणणं, आरत्या, बोधपर पदं म्हणणं या भक्तिमार्गातल्या सोप्या, सर्वांना उपलब्ध असलेल्या, साध्यासाध्या पण आनंददायी कृती आहेत. पण त्या कृती करताना आपण जर यांत्रिकतेनं केल्या तर? तर त्या पठणांचा अपेक्षित परिणाम होणार नाही, हे उघड आहे.

अर्थात स्तोत्रं व त्यातले शब्द जर बरोबर असतील तर त्यांचा जो काही उच्चारणापुरता मूळ परिणाम असेल तो ते घडवतीलच, पण समजा याच स्तोत्रातल्या शब्दांचं शुद्ध स्वरूप, त्यांचा अर्थ, त्यांच्या मागचा अभिप्रेत भाव आपल्याला माहीत आहे का ते पाहिलं, तो माहीत नसल्यास समजून घेतला आणि त्याप्रमाणं मग ते स्तोत्र, आरती म्हणताना तशी म्हटली तर स्तोत्र म्हणजे नुसतेच पोकळ शब्द उरणार नाहीत तर आपल्या चित्ताचा पालट घडवणारी व आपली हाक भगवंतापर्यंत पोचवणारी ती महत्त्वपूर्ण कृती ठरेल, नाही का ?

कारण अनेकदा जी ही प्रसिद्ध स्तोत्रं आहेत, आरत्या आहेत त्यांचे कर्ते हे आपल्या तपश्चर्येनं परमेश्वराच्या निकट पोचलेले ऋषी, संत, महान आत्मे असतात. उत्कट भावावस्थेतली त्यांची ती अभिव्यक्ती असते. म्हणून ते ते स्तोत्र म्हणणाऱ्यालाही भगवंताच्या दिशेनं पाऊलभर पुढं नेण्याचं सामर्थ्य त्या त्या स्तोत्रांना प्राप्त झालेलं असतं.

पण म्हणणाऱ्यानं त्या स्तोत्रामागच्या या भूमिकेचं, अर्थाचं, भावाचं स्थान ओळखलं, अनेकदा त्यात वंदनासारख्या एखाद्या कृतीची अपेक्षा असेल तर ती कृतीही त्या वेळी शरीरानं, मनानं केली, त्या त्या स्तोत्रातल्या बोधाशी तादात्म्य व्हायचं ठरवलं तर

स्तोत्राचा खरा अनुभव येईल व उपयोगही होईल.

याच बरोबर आणखी दोन गोष्टीही आहेत. पहिली अशी की, अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न केलेला असला की, मूळ शब्दही लक्षात राहतो. पुढं कित्येक काळ म्हणण्यानं बेसावधता आल्यामुळं किंवा अर्थ माहीत नसल्यामुळं होणाऱ्या संभाव्य चुका व हानीही टळतात.

मग 'दुःखहर्ता'चं 'दुःखकर्ता' होत नाही. आपलं रक्षण करीत सदैव आपल्या जीवनपथावर आपल्या पुढं चालणाऱ्या रामाला रामरक्षेत अग्रतः 'पथि' सदैव गच्छताम् अशी प्रार्थना करताना तो योग्य भाव येईल आणि 'पति' सदैव गच्छताम् असली चूक होऊन पतीची आठवण किंवा अशी एखादी निरर्थक शब्दयोजना व उच्चारण होणार नाही.

दुसरं असं की, खाण्याचा, पिण्याचा एखादा पदार्थ असला आणि तो जर खूप दर्जेदार असला तर अगदी थोडा पुरतो. साधा चहा जरी उत्तम दर्जाचा असला तर दोन घोटात माणूस समाधान पावतो. उत्तम बासुंदी अर्धी वाटी पुरते. तसं असं अर्थपूर्ण, भावपूर्ण, चित्तपालट घडवणारं, भगवंताशी जवळीक देणारं स्तोत्रपठणही कमी पुरतं. आपला परिणाम करून जातं. त्यामुळं त्या कृतीवर जाणारा अनेकांचा तासन्‌तास वेळही वाचतो. या वाचलेल्या वेळाचा इतर कर्तव्यांसाठी उपयोग होऊ शकतो.

म्हणून स्वामीजींची अगदी रास्त सूचना आहे की, ज्यांचा अर्थ आपल्याला कळतो अशीच स्तोत्रं म्हणावीत. असं केल्यानं मुळातच घडाघडा अनेक स्तोत्रं तासन्‌तास म्हणत बसण्याच्या कृतींना योग्य आवर बसेल.

आता याचा अर्थ असाही नव्हे की, आपल्या म्हणण्यात असलेली अनेक चांगली चांगली स्तोत्रं केवळ अर्थ कळत नाहीत म्हणून म्हणायची सोडून द्यावीत. आपण स्वामीजींच्या म्हणण्यातला

अभिप्राय व्यवहारात आणायचा प्रयत्न करावा.

त्यासाठी असा एक मार्ग असू शकतो की, आपल्याला आधी येत असलेल्यापैकी एकेक स्तोत्र अर्थ समजून घेण्यासाठी घ्यावं.अशा एकेका चांगल्या स्तोत्राचा अर्थ शिकून घेण्याचा आपण मनापासून प्रयत्न करावा. हळूहळू असे अर्थ उलगडत जाऊन अर्थपूर्ण स्तोत्रं म्हणण्याचा फायदाही स्वामीजींच्या सूचनेप्रमाणं आपल्याला होऊ शकेल.

यात अनेकदा असा अनुभव येईल की, आपल्याला अर्थ समजून घ्यायची तळमळ खरंच असली आणि ती वाढत असली तर सांगणाराही आपोआप भेटतो. तो कधी व्यक्तीच्या रूपानं असेल, तर कधी आपल्याला पूर्वी माहीत नसलेल्या पण आता समोर आलेल्या ग्रंथाच्या रूपानं असेल. अशा ग्रंथांत त्या त्या स्तोत्राचा अर्थ-भाष्य दिल्याचं आपल्याला आढळून येईल आणि आपलं काम होऊन जाईल.

असं स्तोत्रपठण हे मग सर्वच दृष्टीनं व्यवहार्य, प्रभावी, परिणामकारक ठरेल.

*

१०.

तुमच्या मुक्तीसाठी आवश्यक ते सारे तुमच्या आटोक्यात आहे, त्याचा उपयोग करा.

- श्री निसर्गदत्त महाराज

ज्यांना परमार्थ म्हणजे काहीतरी गूढ, वेडगळ, भाबडी, भ्रामक, काल्पनिक, जीवनाला निरुपयोगी, अनावश्यक, जीवन नीरस करणारी, नेहमीच्या कौटुंबिक जीवनापासून परावृत्त करणारी गोष्ट नव्हे याची कल्पना आली आहे किंवा पुढं खात्री झाली आहे, ते लोक 'परमार्था'चा अधिक परिचय करून घेण्याच्या प्रयत्नाला लागतात.

मग त्यांना 'परमार्थ' म्हणजे माणसाचं आहे तेच जीवन वेगळ्या, विधायक दृष्टीनं जगण्याची 'जीवनविद्या' आहे कळतं. प्रपंचाचं, जगाचं, स्वत:च्या मनाचं खरं स्वरूप कळतं. नंतर जगताना त्याला परमार्थ तत्त्वांचा किंवा परमार्थातल्या उपदेशांचा प्रत्यक्ष अनुभव येतो. त्या वेळी त्याला मोक्ष, मुक्ती या एरवी रुक्ष, गूढ, फॅड किंवा अशक्यप्राय वाटणाऱ्या शब्दांचं गांभीर्य, खरा अर्थ व आपल्याला त्याची असलेली गरज लक्षात येऊ लागते.

याच देहात माणसाला निरतिशय, निरपेक्ष, निरुपाधिक, निर्भेळ, अखंड आनंद मिळणं हे त्याचं खरं स्वरूप आहे हे कळतं. त्याला माणसानंच कळत-नकळत गोळा केलेली ओझी व बंधनंच कशी आड येतात, हेही लक्षात येतं. त्यात मनाचं, त्याच्या परिवर्तनाचं किंवा उन्नयनाचं महत्त्व काय आहे, हे कळतं. हे घडायला साधारणपणे श्रवण, सत्संग,साधना, सावधता, जगण्यातलं ताजेपण,

प्रयोगशीलता, नम्रता, तत्परता, सातत्य अशा तऱ्हेच्या गोष्टी लागतात किंवा उपयोगी ठरतात हे समजतं.

इथूनच थोडी अडचणीला सुरुवात होते. हे सारं कळणं हेही मोठ्या भाग्याचंच आहे, हे खरंच. पण त्यामुळं अशी समजूतही होते की, ही सारी साधनं, वृत्ती या नसल्या तर आपण मुक्त होऊ शकणार नाही. त्यासाठी बुद्धिमत्ता, अपार कष्ट, सहनशीलता अशा अनेक गोष्टी आपल्या ठिकाणी लागणार असं तर वाटतंच, पण त्या बरोबरच शांत जागा, प्रसन्न वातावरण, चांगली पूरक संगती, तशी संगत देऊ शकणारी माणसं हे सारं असल्याशिवाय मुक्तीची ही वाटचाल अशक्य आहे.आता कुणाचाही प्रपंच झाला किंवा कुठलीही परिस्थिती असली तरी या साऱ्या गोष्टी मिळतीलच याची खात्री नसते. असं सारं तर एकत्र असण्याची शक्यता दुर्मीळच आहे.

मग आमचं ते कामच नव्हे, त्यासाठी माणसं जन्मावी लागतात, त्याला आधीची पुण्याई लागते, ते लोकच वेगळे असतात- अशा पळवाटा सुरू होतात. काही वेळा आमची खूप इच्छा आहे, पण इथं तसा सत्संगच नाही, आजूबाजूला गडबडगोंधळच फार आहे, आमच्या घरी ते वातावरणच नाही, कुणी मला साथच देत नाही- अशा अनेक प्रकारच्या नकारात्मक प्रतिक्रियाही ऐकू येऊ लागतात. त्यातून माणसं परमार्थमार्गापासून दूर जातात व त्यामुळं नुकसानही त्यांचंच होतं.

अशा वेळी हे वचन जरूर लक्षात ठेवण्यासारखं आहे की, मुक्तीसाठी भले अशी अनेक साधनं असतील, अनेक प्रकारच्या कुवती लागत असतील, हे खरंही आहे. पण मुक्ती किंवा निरुपाधिक आनंद किंवा भगवंत हा सर्वांनाच साध्य होण्यासारखा असल्यानं त्यासाठी लागणाऱ्या अनेक क्षमतांपैकी प्रत्येकाच्या परिस्थितीत त्याला मुक्तीला लागणारी क्षमता त्याच्याजवळ ठेवलेली असते. बाह्य

लौकिक सत्संगकिंवा सत्प्रवृत्त-साधनी माणसं जवळ नसतील, पण सद्ग्रंथ असतील, त्यांचं वाचन त्याला शक्य असेल, त्याच्या ठिकाणी 'नाम' घेण्यासारखा उत्तम सत्संग त्याला सहज शक्य असेल, यातलं बोलायला कुणी नसेल तर, मौनाचं साधन त्याला त्या वेळी शक्य असेल.

हे झालं बाह्यांगाचं. मुक्तीचं खरं काम मानसिक व आंतरिकच आहे. बाहेरची साधन-संगती कुठलीही असो नसो निरपेक्षतेनं जगणं त्याला शक्य असेल, शुद्ध प्रेमानं सर्वांशी वागण्याचं साधन त्याला शक्य असेल, सर्वांशी समदृष्टीनं वागणं त्याला त्याच्या प्रपंचात, त्याच्या जागी शक्य असेल - अशा अनेक गोष्टी असतील की ज्यांची त्याच्या मुक्तीसाठी त्याला गरज असेल. त्या गोष्टी त्याच्या ठिकाणी जरूर असतील.

फक्त तयारी हवी ती हे संतवचन समजून घेऊन, माझ्या मुक्ततेसाठी, ध्येयप्राप्तीसाठी आवश्यक तेवढं माझ्याजवळ जरूर आहे हे मान्य करून प्रयोग करण्याची. गरज आहे ती, मी माझ्या जवळचं ते सारं शोधणं आणि त्याचा वापर करणं.

हा वापर करायचा ठरवला तर ही भगवंतप्राप्ती, मोक्षप्राप्ती कुणालाही त्याच्या असलेल्या कुवतीत, परिस्थितीत शक्य आहे.

*

११.

प्रत्येक प्राणी हा या विश्वरंगभूमीवरील सोंग आहे. विश्वनाटकात ते ते कर्तव्य नीट रीतीने बजावून प्रेक्षकांना व आपल्याला संतोष उत्पन्न करीत सोंगाचे विसर्जन करावे, हा विहित मार्ग आहे.

- श्री पंत महाराज बाळेकुंद्रीकर

आपल्या आपल्या भूमिकेचं व्यवस्थित आकलन आणि ते करण्याची कुवत या माणसाला जीवनात यशस्वी करणाऱ्या अगदी मूलभूत अशा दोन गोष्टी आहेत. कुठलाही एखादा नोकरदार जरी घेतला तरी ज्या ठिकाणी तो काम करतो, त्या ठिकाणी त्याच्यावर सोपवलेली एक जबाबदारी किंवा त्याच्याकडून अपेक्षित असलेलं काम ही एक प्रकारची भूमिका असते.

त्या भूमिकेचं ज्यांना व्यवस्थित आकलन होतं, ज्यांना आपण शिपाई, कामगार, मदतनीस, कारकून, मुकादम, साहेब, निर्णायक अधिकारी जे जे कुणी असू ते ते जर व्यवस्थित कळलेलं असेल, तर मग त्या त्या पदाला लागणारी कामाची माहिती, ते ते काम करण्याचं कौशल्य, त्यात येणाऱ्या अडीअडचणींवर काढण्याचे मार्ग या दृष्टीनं तो प्रयत्नशील राहतो.

असा मनुष्य त्या मालकाला, संस्थेला, उद्योजकाला, व्यावसायिकाला अत्यंत उपयुक्त काम करू शकतो, त्याला संतोषदेऊ

शकतो. मालकानं दिलेल्या पैशाचा-पगाराचा मोबदला देऊ शकतो. मालकही त्याच्या कामगिरीमुळं त्याच्यावर अधिक जबाबदाऱ्या टाकू शकतो, त्याला प्रगतीची पुढची संधी देऊ शकतो.

हे सगळं सांगितलं ते खरं एवढं सोपं आणि सरळमार्गी काम आहे. पण आपण एखाद्या विशिष्ट कामासाठी आलेले-नेमलेले आहोत,या मूळ मुद्याचंच अनेकांना आकलन-भान नसतं. त्यामुळं काय अपेक्षित आहे हे ज्याला कळलेलं नाही, असा माणूस त्याला जे येतं आहे ते करण्याचा प्रयत्न करतो. इतर काय करीत आहेत तिकडं लक्ष देतो किंवा त्याला स्वत:ला कुठलं काम आवडतं आहे, ते करण्याचा प्रयत्न करतो. असल्या अनेक विपरीत गोष्टी घडताना अनेक ठिकाणी आढळून येतील. त्यामुळं साहेब उठून फाईल घेतात-भांडं घेऊन पाणी पितात आणि नोकर निर्णय घेतात, परस्पर कामं करून घेत असतात, असलं काहीतरी विचित्र चित्र अनेक ठिकाणी दिसतं.

यात कुणाला लहानथोर समजण्याचा प्रकार नसला, तरी अपेक्षित कामं-प्रगती-दर्जा-परिणाम सर्वत्र का दिसत नाहीत, याचं ते सर्वसाधारण कारण आहे. एखाद्या नाटकातल्या राजाचा वेष घातलेल्या पात्रानं सेवकाचे किंवा सेवकानं चुकून राजाचे संवाद म्हटल्यावर नाट्यप्रयोगात जो गोंधळ होईल, प्रेक्षकांची जी निराशा होईल त्यातला काहीसा हा प्रकार असतो.

याच भूमिकेच्या प्रश्नाला आणखी एक बाजू आहे, ती म्हणजे भूमिका करणारा आपली नक्की कोणती भूमिका आहे, हे भूमिका करण्यापूर्वी नीट समजून घेतो. त्याप्रमाणं आपलं वर्तन त्या काळात कसं उत्तम होईल याची काळजी घेतो. इतकंच नाही तर भूमिका करताना त्या त्या भूमिकेशी तादात्म्य होतो. तेव्हा वेळी भान विसरून तो क्षणभर राजा-भिकारी-क्रूर-लाचार,काय असेल ती भूमिका

जगतो, तेव्हाच ती उत्तम समजतात. प्रेक्षकांनाही संतोषजनक असते. निर्मात्यालाही संतोषजनक असते.

पण याच बरोबर ती भूमिकाच आहे, याचं भान असल्यानं नाटक संपलं की नाटकात राजा असला तरी घरचा वेष चढवल्यावर बाहेर रथ-गाडी उभी आहे का किंवा ऐषआरामात टॅक्सी ठरवावी का याची वाट न पाहाता खिशात असलेल्या पैशाप्रमाणे एक सामान्य माणूस म्हणून रिक्षानं जाणं परवडेल की बसनं याचा निर्णय घेतो आणि तोच खरा 'पूर्ण' नट होतो.

नाहीतर तादात्म्य तसंच राहिलं तर बाहेर पदोपदी तो खट्टू होईल, नाराज होईल, कुणी मुजरा करतो का याची अकारण, अयोग्य वाट पाहील - निराश होईल. घरच्यांना व इतरांनाही त्रासदायक ठरेल. त्यामुळं रंगमंच बदलला, भूमिका बदलली की, जो त्यानुसार आता आपल्यात बदल कोणते करावे याचं भान ठेवू शकतो, त्याचा अंमल करू शकतो, तोच खरा, श्रेष्ठ, संतोषदायक व आदर्श नट म्हणता येतो.

तीच अवस्था या मोठ्या जगाच्या रंगभूमीवर माणसाची आणि त्याला कराव्या लागणाऱ्या विविध भूमिकांची आहे. यातलं सर्वांत पहिलं आकलन हे की, माणूस स्वत:ला कितीही श्रेष्ठ समजला, व्यक्तिश: असला तरी जगाचा कॅनव्हास एवढा मोठा आहे की, त्यात आपल्या वाट्याला कोणतीही भूमिका असली तरी मुळात आपण या साऱ्या रंगमंचावर एक अगदी छोटंसं पात्र आहोत. इतके लहान की आपल्या वाट्याला एवढ्या मोठ्या नाटकात भूमिका यावी, हेच आपलं भाग्य म्हणावं लागेल.

मग दुसरं आकलन असं की, या भूमिका कधी ज्ञानार्जक, कधी प्रियकर, कधी प्रेमळ पती, पिता, बंधू, समाजघटक, नोकर, मालक, मित्र, शेजारी अशा नाना तऱ्हेच्या, सतत बदलत राहाणाऱ्या

पण गरजेच्या भूमिका त्याच्या वाट्याला येतात. त्यांचं व्यवस्थित आकलन व अभिनयमाणूस करू शकला तर तो जीवनात स्वत:ला व इतरांना संतोषदायक नाही का होणार ?

उलट पंत महाराज म्हणतात त्याप्रमाणं,या साऱ्यांत भगवंताचा एक अंश म्हणून, जी जन्मापासून मरेपर्यंत प्रगत होत राहाण्याची प्रत्येकाला भूमिका मिळालेली आहे, ती प्रत्येकाच्या लक्षात आली तर वरची सारी सोंगं करूनही पुन्हा एक अधिक प्रगत किंवा मुक्त जीव म्हणून माणसाला आनंदानं जगाचा निरोप घेता येईल.

या सुवचनाच्या निमित्तानं हा केवढा उदात्त संदेश आपल्याला मिळेल ! तो कळला, पटला, मानला तर आपल्यासारखे भाग्यवान आपणच असू.

*

१२.

दुःखात सुख पहावे व सुखात देखील दुःख पहावे.

- श्री अंबुराव महाराज

माणसाच्या दुःखाची अनेक कारणं आहेत. त्यात एक प्रधान कारण बेसावधता हे आहे. जास्त जेवून मनुष्य अजीर्णाच्या दुःखात पडतो तो बेसावधपणामुळं. भूक लागते म्हणा, आवडीचा पदार्थ मिळतो म्हणा, काहीही म्हणा - मुळात जेवताना भुकेच्या पुढं जातो तो सावधता न राहिल्यानंच. एवढ्या साध्या दुःखापासून मनुष्य अतिप्रपंच करून मुक्त होण्याऐवजी, अतृप्तीत अडकून पुन्हा जन्मबंधनात अडकतो, तोही प्रपंचाची गोडी लागून गरजेपेक्षा जास्त प्रपंच वाढवताना बेसावध राहिल्यामुळंच. अशा तऱ्हेनं अनेक पातळ्यांवर ही बेसावधतेची अडचण आहे, हे लक्षात येईल.

ही बेसावधता जावी किंवा जास्तीत जास्त सावधता यावी यासाठी काय करावं, याचे अनेक उपाय शोधण्याचा प्रयत्न केला गेला आहे. त्या उपायांमध्ये संवेदनाशील राहाणं, नामात राहाणं, अनुसंधान टिकवणं, सत्संगात नियमानं राहणं, खऱ्या कर्त्याचा शोध घेणं, कर्म करीत असताना कर्त्याविषयी जागरूक राहायचा प्रयत्न सतत करणं, खऱ्या अर्थानं सदैव कृतज्ञ राहाणं असे अनेक मार्ग यासाठी शोधले गेले आहेत, वापरले गेले आहेत. त्यांचा उपयोगही होत असतो.

अशा अनेक मार्गांपैकी एक मार्ग या बोधवचनात आला

आहे.सावधता ही तशी सदैव टिकवायची गोष्ट आहे. ती जर सदैव माणसाला अनुभवायला येणाऱ्या गोष्टीशी-घटनेशी-मन:स्थितीशी जोडता आली, तर सावधतेची सवय थोडी अधिक लागेल. सुख-दु:ख हे सामान्य माणसाला नेहमी अनुभवायला येणारे दोन अपरिहार्य घटक आहेत. काही योगी किंवा त्या योग्यतेची माणसं सोडली तर सर्वसामान्य मनुष्य सतत सुख-दु:खाचे हेलकावे खात असतो. जणु काही सुख-दु:खाचा पाठशिवणीचा खेळच त्याच्या जीवनात सुरू असतो.

या सुख-दु:खाच्या अनुभवांचं वैशिष्ट्य असं की, हे दोन्हीही अनुभव त्याला व्यापून टाकतात,बेसावध करतात.दु:खात मनाविरुद्ध, अनपेक्षित, त्रासदायक, प्रतिकूल असं घडत असल्यानं तो दु:खात बुडून जातो व बेसावध होतो. दु:खांची मालिका जास्त माझ्याच वाट्याला आली आहे, लोक मात्र आनंदात आहेत, माझ्या दु:खापेक्षा दुसऱ्याचं दु:ख परवडलं, माझं चुकलेलं नसताना हे माझ्या वाट्याला आलं असं म्हणणं, दु:ख दूर करण्याऐवजी विसरण्याचे कृत्रिम मार्ग अवलंबणं - असं काहीसं चिंतन व प्रवास त्याच्याकडून बराच काळ घडतो.

तीच स्थिती सुखात असतानाही. त्यात आपल्या कर्तृत्वाचा अहंकार, सुख टिकावं म्हणून प्रयत्न, इतरांना ते यश-सुख दिसावं-त्यांच्याकडून त्याचं कौतुक व्हावं, वेळी त्या निमित्तानं इतरांपेक्षा आपला वरचढपणा त्यांना दिसावा-असल्या कुठल्यातरी प्रयत्नात तो असतो.

अर्थात यातलं टिकत काहीच नाही. जितकं दु:ख क्षणभंगुर तितकंच सुखही क्षणभंगुर. राहते ती फक्त अस्थिर - हेलकाव्यांची अवस्था व त्याला कारण असलेली बेसावधता. या साऱ्या अस्थिरतेलाच तो 'जीवन' म्हणतो. मानवी जीवनाची तीच जणु काही

हद्द किंवा झेप आहे, असंही त्याला ठामपणानं वाटतं.

वास्तविक अशा तऱ्हेच्या अस्थिर,अपूर्ण, सतत परिवर्तनशीलजीवनाला खरेपण आहेच, पण माणसाची झेप एवढं कनिष्ठ जीवन जगण्याचीच आहे असं समजणं चूक आहे. या हेलकाव्यांपलीकडं जायची आणि वाहत्या पाण्यातल्या स्थिर, सुगंधी कमळासारखी किंवा हलत्या पाण्याच्या सरोवरातल्या शांत, डौलदार हंसासारखं राहाण्याची कुवत व झेप माणसात आहे. ती 'तटस्थ' राहाण्यानं, स्थिर गोष्टीला मन चिकटवून ठेवण्यानं येऊ शकते, हे संतांनी दाखवून दिलं आहे.

त्याचा एक मार्ग सावधतेचा. तोच या सुख-दुःखाच्या द्वंद्वाशी जोडला, टिकवला तर ? कारण या दोन गोष्टी वेगवेगळ्या दिसल्या, विरोधी वाटल्या तरी त्या तशा पूर्ण विरोधी कधीच नसतात. दुःखात दुःखाच्या मागंपुढं असलेल्या आणि वेळी त्या दुःखातही दडलेल्या सुखाची जाणीव ठेवली, तसंच सुखातही मागंपुढं ठेवलेल्या आणि वेळी त्या सुखातही दडलेल्या दुःखाची जाणीव ठेवली, थोडं तटस्थतेनं ते घेतलं तर बेसावध व्हायला होणार नाही. अकारण सुखाचं काय, दुःखाचं काय चिंतन थांबेल. ते कर्तव्याला, पुढं जायला, भगवंताचं स्मरण, उपासना करायला उपयोगी पडेल.

एखाददुसऱ्या उदाहरणानं हे अधिक स्पष्ट होऊ शकेल. कडू औषध घेताना दुःख हे वाटतंच, पण पूर्वीचं योग्य आहारानं टिकलेल्या आरोग्याचं सुख आणि नंतरही औषध योजनेनंतर पूर्ववत होणारं आरोग्याचं सुख याचं भान ठेवलं, तर कडू औषधाचं दुःख राहाणार नाही. त्यातही त्या कडू वाटणाऱ्या चवीमागं असलेल्या शरीरातला बिघाड दुरुस्त करणाऱ्या प्रभावी शक्तीचं भान व सावधता ठेवली, तर कडूपणाचं दुःख किती उरेल? हीच गोष्ट आयुष्यात येणाऱ्या अपघात, वियोग, मृत्यू अशा अनेक दुःखांची मोठ्या

प्रमाणावर आहे.

सुखाची अवस्था ही यापेक्षा वेगळी नाही. नोकरी नसलेला माणूस खूप कष्टपूर्वक ती मिळवण्यात यशस्वी होतो किंवा बढतीचं सुखमिळवलेला ते कळता क्षणी मोठ्या सुखात असतो. पण त्याच्या मागं घेतलेल्या अपार कष्टांच्या दु:खाची आणि पुढं वाढून ठेवलेल्या पारतंत्र्याची, जबाबदाऱ्यांची, वाढत्या अपेक्षांची, वैयक्तिक सुखांना द्याव्या लागणाऱ्या तिलांजलींची अशा अनेक दु:खांची याच सुखाच्या क्षणी जाणीव ठेवली तर हे नोकरीचं, बढतीचं सुख हेलकावा देणारं ठरणार नाही आणि बेसावध करणारंही ठरणार नाही.

अशी सुख-दु:खातली सावधता ही दैनंदिन ताणतणाव कमी करील, तटस्थतेची सवय लावील, चित्ताला शांततेचा परिणाम देईल, सुख-दु:खांची क्षणभंगुरता प्रत्ययानं समजली तर स्थिर काय, शाश्वत काय याची जाणीव वाढीला लागून मग व्यापक, शाश्वत व उच्चतर जीवनाची पूर्वतयारी व प्रभातही होईल.

*

१३.

जे वाट्याला येईल त्याच्या पुढेच जा.

- श्री निसर्गदत्त महाराज

निसर्गाची एकूण रचना पाहिली तर त्यात सातत्यानं बदल व पुढं जाणं घडत असल्याचं दिसेल. दिवसाला तुम्ही चांगलं म्हणा, वाईट म्हणा तो काही थांबून राहात नाही. एखाद्याला दिवस अत्यंत आनंदाचा गेला म्हणून तो तसाच पुढं चालू ठेवता येत नाही किंवा वाईट चालला आहे म्हणून लवकर संपवता येत नाही. रात्रीलाही आपण चांगली ठरवा, वाईट ठरवा तीही मागं पडल्याशिवाय राहात नाही. तीच अवस्था ऋतूंची आहे, हवापाण्याची आहे, उमलणाऱ्या आणि मिटून जाणाऱ्या फुलांची आहे, अंकुरणाऱ्या बीजांची आहे, आकारून प्रचंड विस्तारणाऱ्या आणि अखेर वठून जाणाऱ्या वृक्षांची आहे.

माणूस तसा या निसर्गरचनेचा एक अविभाज्य घटकच आहे. बाह्यांगानं तर आहेच आहे. विलक्षण अंतर्याम ही त्याची खासियत आहे. तीही मूलतः निसर्गप्राप्तच आहे. संवेदना, मूल्य-कल्पना, संस्कृती - सारं विलक्षण असलं तरी मूळ ज्यांच्यावर ते आधारलेलं आहे ते सारं अर्धचेतन-चेतन पेशींचं अगम्य विश्व त्याला निसर्गाकडूनच मिळालेलं आहे. म्हणूनच त्याला निसर्गाच्या उघड दिसणाऱ्या, काही वेळा सूक्ष्म असणाऱ्या आणि काही वेळा अभिप्रेत असलेल्या कार्यपद्धतींवरून बरेचदा अत्यंत आदर्श मानवी जीवन शिकता येतं.

हे सारं पाहायचं अशासाठी की, निसर्गाच्या या विलक्षण ताकतीच्या घटकालाच जास्तीत जास्त करून दु:खाचं धनी व्हावं लागतं. म्हणून यादु:खाच्या परिहारासाठी काही उत्तरं निसर्गाकडं नक्कीच असतील, ती शोधता यावीत.

उदाहरणानं पाहायचं तर वेलीनं सारे कष्ट सोसून, जीवनरसाचा एकेक थेंब देऊन वाढवलेलं उत्कृष्ट फूल फुलल्यावर वेलीला, स्वत: फुलाला आणि संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाला आनंदित करतं. पण परिपक्व झाल्यावर ना ते कवटाळून ठेवण्यासाठी वेल धडपडत, ना फूल प्रयत्न करीत.

यात त्यांना आपल्यासारखं 'मन' नसतं म्हणून हे जमतं,असं समर्थन करण्यात अर्थ नाही. फूल काय, फळ काय परिपक्व होऊन जितक्या सहज फुलावं तितक्या सहजतेनं मलूल होऊन पुढचं जीवन स्वीकारतं, हे कुठंही, कधीही कुणाही संवेदनाशील, जागरूक माणसाला अनुभवायला येईल.

क्षणभर याच बाबतीत एखादं मानवी आयुष्यातलं चित्र पाहू. असाच जीवनरस ओतून वाढवलेलं मूल मोठं संस्कारित होतं, पुढं जबाबदार युवक होतं. आईला काय, त्याला काय किंवा तो जिथं जगतो त्या माणसांना काय ही आनंदाची घटना असते. निसर्गक्रमानं, त्या त्या समाजव्यवस्थेप्रमाणं एखाद्या सुयोग्य मुलीच्या हाती आपला हा मुलगा सोपवल्यावर, खऱ्या अर्थानं 'सोपवणाऱ्या' आणि त्याच्या पुढच्या सहजीवनातल्या प्रगतीकडं तटस्थ, आनंदानं पाहू शकणाऱ्या माता किती कमी आढळतात !

उलट आपला त्या मुलावरचा हक्क कुठल्या ना कुठल्या प्रकारे शाबूत ठेवून, त्या मुलाला मनानं एखाद्या मालमत्तेसारखं कळत नकळत कवटाळून ठेवू पाहाणाऱ्या मातांची संख्या किती जास्त असते! मग परिणाम म्हणून अशा मातांनाच नव्हे, तर घरातल्या इतर

सर्व घटकांनाही दुःखाला सामोरं जावं लागतं. यात मातेला किंवा अशा कुठल्या घटकालादोष देण्याचा प्रश्न नाही. कोणती मनोरचना दुःखदायक होते, ते समजून घेण्याचा प्रयत्न आहे, हे स्पष्ट केलेलं बरं!

अशा वेळी निसर्गाच्या जीवनपद्धतीची प्रकर्षानं आठवण येईल. गळून पडलेलं पान किंवा फूल पुन्हा जवळ घेण्यासाठी झाडाची फांदी कधी वाकलेली दिसत नाही, सागराकडं निघालेली नदी मागं ओढणारा तिचा जन्मदाता कुठला पर्वत दिसत नाही !

यातून माणसाच्या दुःखाच्या एका मोठ्या कारण परंपरेचा उलगडा होतो. निसर्गदत्त महाराज स्पष्ट करतात तसं 'जे वाट्याला येईल' त्याच्या पुढं जायला माणूस तयार नसतो. काही वेळा तयार दिसतो, पण तो सोयीसाठी, सर्व बाबतीत नाही. नको असलेला माणूस, नको असलेली घटना वाट्याला आली, तर तो ती कवटाळून नाही बसत. तो तिच्या पुढंच जायचा प्रयत्न करतो.

पण एखादं यश, सुखकारक घटना कवटाळून बसू इच्छितो. जितक्या कटाक्षानं तो नको असलेलं मागं टाकून पुढं जायचा प्रयत्न करील, तितक्याच तटस्थतेनं तो हवं वाटणारं, मिळालेलं यश मागं टाकून पुढं जायचा प्रयत्न करील का ?

काहींच्या बाबतीत हे उलटसुद्धा असतं. त्यांना मिळालेल्या चांगल्या, सुखाच्या क्षणांचं साधं भानही नसतं. पण कधीचं तरी आठ-पंधरा दिवसांपूर्वीचं दुःख, पाच-दहा वर्षांपूर्वीचा दुःखदायक ठरलेला माणूस ते कवटाळून ठेवू पाहातात. एकूण काय, हे रेंगाळणं प्रत्येकाच्या स्वभावानुसार असलं तरी वाट्याला येईल ते भले त्यांना हवंसं असो, नकोसं असो - त्याच्या पुढं जायचं काही त्यांना जमत नाही. याचा परिणाम म्हणून मग जुनी दुःखंसुद्धा आजची दुःखं होऊन बसतात. जुने आनंद आजचे कृत्रिम आनंद व्हायचा प्रयत्न करतात. हे

सारंच अनैसर्गिक असल्यानं माणसाला बद्ध व दुःखी करतं.

वास्तविक यशाचा दिवस असो किंवा अपयशाचा दिवस असो, तो तेवढ्याच तासांचा असतो आणि तेवढ्याच तासांनी संपतो. इतकंच नाही, तर पुन्हा नव्या संधी, नव्या शक्यता, नव्या आशा, नवा ताजेपणा घेऊन पुढचा दिवसही निसर्गात उगवलेला असतो. त्याला जर तितक्याच ताजेपणानं, नवेपणानं आपण सामोरं जाऊ शकलो तर ते जीवन खरं नैसर्गिक जीवनपद्धतीचं आणि त्यामुळं विलक्षण सरल व आनंदमय असतं.

पण यासाठी जे जे वाट्याला येईल, त्याच्या पुढं आपल्याला रोज निसर्गातल्या सहजतेनं जायचं आहे, एवढा महामंत्र अंमलात आणायला हवा !

*

१४.

'हे देवाने दिले आहे'यात 'हे'अधोरेखित नसून 'देवाने दिले आहे' हे अधोरेखित करावयाचे आहे.

- पूज्य काकासाहेब तुळपुळे

आयुष्यात प्रापंचिक गोष्टी पार पाडण्यात अनेकांना यश मिळतं. घरदार होतं, थोडंफार वैभव गोळा होतं, चार वस्तू येतात, मुलंबाळं होतात, चांगले जावई मिळतात, गुणी सुना मिळतात, नातवंडं होतात. नकळत या साऱ्या कर्तृत्वाचा अभिमानही वाटतो. ज्यांना हे सारं स्वत:चंच कर्तृत्व आहे असं वाटतं, त्यांचा विचार इथं करण्याचं कारण नाही. कारण अहंकाराच्या अडथळ्यानं त्यांच्या खऱ्या प्रगतीचा मार्ग त्यांनी स्वत: आधीच अडवलेला असतो.

पण इतर अनेक लोकांना या कर्तृत्वात पूर्वजांचा, हितचिंतकांचा, मित्रमंडळींचा, घरातल्या लहानथोर सदस्यांचा, समाजाचा-असा अनेकांचा वाटा आहे असं लक्षात येत असतं. काही जण केवळ देखाव्यापुरता इतरांच्या सहकार्याचा,मदतीचा उल्लेख करतात.पण आतून त्यांचं खरं मत हे सारं त्यांच्या स्वत:च्या कर्तृत्वानंच झालेलं आहे, असंच असतं.

अशांचाही इथं फारसा विचार करण्याचं कारण नाही. पण ज्यांना खरोखरीच मनापासून या कर्तृत्वातला इतरांचा वाटा जाणवतो, ते तसं मनापासून म्हणतात, इतकंच नव्हे, तर त्यांच्या वर्तनावरही त्याचा परिणाम दिसून येतो.

यांतल्या काही लोकांना या दृश्य घटकांबरोबरच इतरांच्या शुभेच्छा, अनेकांचे मनापासूनचे आशीर्वाद, देवाची सांभाळणूक, गुरूंची किंवा संतांची कृपा असे न दिसणारे, पण सूक्ष्म व प्रभावशाली घटकही लक्षात येतात, त्यांची जाणीवही ते ठेवतात. अशी जाणीव ठेवण्यात माणसाच्या ठिकाणची जी विशेष कृतज्ञताबुद्धी आहे, तिचा अधिक साजेसा, योग्य व आवश्यक वापरही झाल्याचं दिसून येतं.

या'देवाच्या देण्या'ची जाणीव, त्यांची श्रद्धा तर बळकट करतेच, पण त्याच बरोबर या संतवचनात जो बारकावा दाखवला आहे, तो लक्षात घेऊन जर ही श्रद्धेची वाटचाल घडली तर ती वाटचाल त्यांची पारमार्थिक उन्नती घडवते, देव अधिक जवळ आणते.

अशी देवाच्या कृपेची, देण्याची जाणीव ठेवणाऱ्यांना एका बाबतीत सावध राहाण्याची प्रेमळ सूचना या वचनात आहे. तिचा अनुभवही व्यवहारात अनेकदा येतो. अशा लौकिकदृष्ट्या भाग्यवान माणसांचे प्रपंच वाढत जातात, घरंदारं मोठी होतात, चांगली होतात, प्रशस्त सुखसोयीची होतात, काही मानमान्यता मिळतात, चांगली मुलं नातवंडं मिळतात. असे लोक जरी हे सारं देवानं दिलं आहे असं समजत असले, अगदी मनापासून समजत असले, तसं म्हणून दाखवीत असले तरी प्रपंचाच्या भ्रमापासून मात्र मुक्त होत नाहीत.

मुलांच्या प्रपंचात, त्यांच्या घरादाराच्या मांडणीत, त्यांच्या उद्योगव्यवसायात, त्यांच्या मुलांत म्हणजे यांच्या नातवंडांत इतके गुंतून जातात की,'हे सारं देवानं दिलं आहे' हे म्हणण्यापलीकडं त्या 'देणाऱ्या देवाचं काही करायला', खरं तर त्या 'देणाऱ्या देवाला''न्याय' द्यायला, त्यांच्याकडं वेळ व शक्तीच उरत नाही. अशा वेळी ही माणसं 'हे' म्हणजेच त्यांचा प्रपंच अधारेखित करणारी माणसं

ठरतात.

आपल्या मुलांचं करणं इथंपर्यंत प्रपंच हा मुळात कर्तव्य म्हणूनसर्वांच्या मागं लागला आहे, हे खरं. तो केला तेव्हा व्यवसाय किंवा त्या प्रपंचापुढं देवाचं नाव घ्यायला, काही पाठपारायण करायला, सत्संगाला जायला, किमान रोज काही तास तरी नित्यनेम करायला त्यांना सवड मिळत नाही, हे खरं होतं.

पण आता नातवंडांच्या प्रपंचापुढंही देवाला द्यायला वेळ मिळत नाही, हे नक्की कशामुळं घडतं ? कर्तव्यामुळं, प्रपंचाच्या आवडीमुळं, आपल्याशिवाय तो होणार नाही, विशेषतः 'नीट' होणार नाही, अशा भ्रमामुळं की, आपण जे देवाचं देणं लागतो त्याची खरी जाणीव किंवा निकड नसल्यामुळं - हे विचार केला तर लगेच ठरवता येईल.

आता हेही लक्षात येऊ शकेल की, आपण ही सारी देवाची कृपा आहे असं म्हणतो आहोत, सांगतो आहोत हे खरं, पण ते किती 'खरं आहे', किती 'मनापासून'आहे ? तसं असतं तर आपला प्रपंच झालेला असताना स्वतःच्या प्रपंचाची, कर्तव्याची हाक आल्यावर धाव घ्यावी तशी मुलांच्या किंवा नातवांच्या प्रपंचात देवाची हाक कर्तव्याच्या नावाखाली विसरली किंवा दुर्लक्षिली गेली असती का ?

याचा विचार जरी मनापासून केला तरी 'देवानं दिलं आहे' याला अधोरेखन म्हणजे काय ते लक्षात येईल. त्याची गरज व त्यासाठी करायची मनाची, वैराग्याची, वानप्रस्थानाची तयारीसुद्धा आपल्याकडून वेळीच होऊ शकेल.

यातही पुन्हा हे स्पष्ट केलेलं बरं की, हे देवानं दिलं आहे हे जाणणं व त्याप्रमाणं वेळीच वागणं म्हणजे काही मुलानातवंडांचं वात्सल्य विसरणं, काही खरं काम मुद्दाम टाळणं, उगीच कठोरता, तणाव आणणं नव्हे.

प्रापंचिक कामाला व भगवंताच्या सेवेला, उपासनेला आता द्यायचं प्राधान्य लक्षात घेणं, ते कौशल्यानं वेळीच करणं, त्यातमुलानातवंडांनाही त्यांची भूमिका - आपली प्राधान्य लक्षात आणून देणं हे अभिप्रेत आहे. देवाचं आहे म्हणून देवाला तरी आपण काय देणार आहोत की, जे त्यांच्याकडं नाही किंवा आपल्याला देता येऊ शकेल ? तसं काही लौकिक देणंघेणं नाहीच.

मुख्य भाव, जाणीव, शांतपणे वाचन-चिंतन-ध्यान-नाम-नेम यांना द्यायचा वेळ, गरजूंच्या रूपानं उभ्या असलेल्या समाजातल्या आपल्या नात्यागोत्याच्या नसलेल्यांना द्यायचा तनमनधनाचा आपला वाटा देणं,असं सारं या साऱ्या देण्याचं स्वरूप आहे. ते करण्यात प्रपंचाच्या भुलीनं बेसावध राहिलो तर मात्र 'देवानं दिलं' हा पोकळ गजर होईल, आर्त मंत्र नाही. ज्याचा पारमार्थिक प्रगतीला उपयोग नाही.

म्हणून पूज्य काकासाहेबांनी सुचवलेलं अधोरेखन निदान पारमार्थिक म्हणवणाऱ्या प्रापंचिक भाग्यवंतांनी आचरलं तर त्यांची स्वत:चीही खरी प्रगती साधेल अन् ज्यांच्या रूपानं देव उभा आहे त्या खऱ्या गरजवंतांचीही !

*

१५.

ज्याला कर्माच्या फलाची अपेक्षा करताना खंत वाटत नाही, त्याची सर्व साधना व्यर्थ आहे.

- पूज्य साईबाबा

जाणीवपूर्वक कर्मांची निवड करून आयुष्यभर कर्मं करीत राहाणारे लोक मुळात कमीच आढळतात. बेसावधपणे, वाट्याला आली तशी, त्या क्षणी ज्याचा जोर होईल, आवड लागेल, इतर करीत असतील तशी कर्मं करीत राहाणारेच लोक जास्त आढळतात. त्यामुळंच कर्मांचा सर्वसाधारण दर्जा कमी राहातो. जगातही जग सुरू राहाण्यापुरतेच बदल होतात.व्यक्तीही एक जीव म्हणून साठसत्तर वर्षांची कर्मांची दुर्मीळ संधी मिळूनही फारशा प्रगत न होताच नुसत्याच जातात.

या कर्मांच्या संधींचं चीज करण्यासाठी प्रयत्नशील असणारे जे काही कमी लोक आढळतात ते जाणीवपूर्वक कर्मांची निवड, ती करण्यातलं कौशल्य अशा अनेक गोष्टी विचारपूर्वक करतात, निदान तसा प्रामाणिक प्रयत्न करतात. त्यांच्याकडून जगाला आदर्श ठरतील, मनुष्यमात्राचं जीवन उच्चतर होईल अशी काही भर पडते. इतर सामान्य माणसांच्या एवढंच आयुष्य लाभूनही स्वत:ची जीव म्हणून अधिकाधिक प्रगती, वेळी मुक्तताही साधून ही माणसं जगाच्या पडद्याआड जातात.

या ठिकाणी अभिप्रेत प्रगती अर्थातच निर्वासन होण्यातली, आनंदमयता वाढण्यातली आहे, हे सांगायला नकोच. म्हणून अशा

तऱ्हेची माणसं जाणीवपूर्वक घेतलेल्या कर्मांच्या मार्गानं 'साधना' करतात असं म्हणावं लागतं. कारण उच्चतर हितकारक उद्दिष्ट व त्यासाठी निश्चित प्रयत्न हे साधनेचं स्वरूप त्यांच्या जीवनात आढळतं.

अशा साधकांना येणारा एक मोठा अडथळा या बोधवचनाच्या निमित्तानं समोर येत आहे. कर्मं त्याच्या त्याच्या आयुष्याच्या परिस्थितीच्या ठेवणीनुसार असली तरी अशा प्रत्येक साधनी माणसाच्या कर्माला हेतू असतो आणि तो साध्य व्हावा म्हणून त्यानं कर्माची निश्चित आखणी व अंमलबजावणीही केलेली असते. अशा वेळी तो हेतू साध्य व्हावा असं त्याला वाटत असतं.तो साध्य झाल्यानं त्याला आनंद होतो. अर्थातच न झाला तर दु:खही.

इथंच खऱ्या साधनी माणसाची कसोटी लागते. कर्मं उत्तम निवडावी, अत्यंत कौशल्यानं ती करावी, अगदी शक्तीचा शेवटचा थेंब असेपर्यंत करावी यात तर दुमत नाहीच. पण पुढं हेतू साध्य होणं किंवा त्या कर्माचं फळ मिळणं हे काम मात्र भगवंतावर, गुरूंवर सोपवावं असं खऱ्या साधकाकडून अपेक्षित आहे. या सिद्धांतावर या वचनात एका वेगळ्याच पण जाग्या करणाऱ्या पद्धतीनं भर दिला आहे.

पू. साईबाबांचं तर म्हणणं असं आहे की, फळाची अपेक्षा करू नये हे तर खरंच आहे,आवश्यकही आहे, पण माणूस म्हणून, पूर्वीपासून फळाच्याच आशेनं, अपेक्षेनं कर्म करायची सवय झाली म्हणून किंवा अपेक्षा करणं चुकीचं आहे हे माहीत असून, मान्य असूनही त्या क्षणी बेसावध राहिलो म्हणून जरी फळाची अपेक्षा मनात आली तरी साधनी माणसाला त्याची निदान खंत वाटली पाहिजे.

एक वेळ निरपेक्ष होणं किंवा मनात अपेक्षा न येणं हातात

नसेल किंवा ते साध्य झालं नसेल, पण अशी खंत वाटायला 'अपेक्षा वाटणं चुकीचं आहे' याची तरी मनाची धारणा पक्की हवी ना? ती पक्की असेल तर एखादं चुकीचं कृत्य झाल्यावर जसा माणसाला पश्चाताप होतो किंवाखंत वाटते तशी ती वाटली, तर आपण खऱ्या अर्थानं निरपेक्ष आहोत किंवा बनायचा प्रयत्न करीत आहोत, याची खात्री होईल.

साधकाचं ध्येय जर मुक्तता किंवा आनंदप्राप्ती किंवा देवप्राप्ती हे आहे तर या फळाच्या बाबतीतल्या निरपेक्षतेचा किंवा फळाची अपेक्षा चुकून बाळगली तरी त्याची खंत बाळगण्याचा या ध्येय प्राप्तीत कोणता संबंध आहे असं एखाद्याला वाटण्याची शक्यता आहे. त्याची अनेक कारणं आहेत.

पहिलं कारण एकाग्रतेसंबंधी आहे. माणसाला कर्मांची असलेली संधी जर देवप्राप्तीसाठी 'संधी' म्हणून वापरायची असेल तर त्याच्या हातून उत्तमात उत्तमपणे कर्म व्हायला त्याला त्याच्या सर्व क्षमतांनिशी पूर्ण एकाग्र होऊन ती करावी लागतील. त्या एकाग्रतेत फळाची आशा, अपेक्षा हा एक नकळत येणारा विचार व अडथळा असतो.

उत्तम एकाग्रतेनं अभ्यास चालू असताना निकाल-मार्क, त्यावरचं पुढचं जीवन याचा विचार जरी मनात आला तरी अभ्यासातली एकाग्रता जाऊन चित्त विचलित व्हावं, वेळी मानसिक अस्थिरता-तणाव यावेत तसं हे होतं. म्हणून फळाची अपेक्षा नको.

दुसरं एकत्रित परिणाम व फळव्यवस्थेसंबंधी आहे. ते असं की, कर्माची आखणी मानवी शक्तीप्रमाणं कितीही अचूक केली तरी अमुकच एक फळ त्याला येईल याची खात्री या प्रपंचात नाही. कारण केवळ आपले प्रयत्न एवढंच कारण अमुक एक फळ यायला पुरेसं नसतं. उत्तम संस्कार, वातावरण, याची काळजी घेऊनसुद्धा मोठेपणी

मुलगा अमुकच स्वभावाचा होईल याची खात्री देता येत नाही, तसंच हे सरळ आहे.

त्यामुळं या साऱ्या कार्यकारणभावांची यथायोग्य काळजी घेणारी जी निसर्ग किंवा परमेश्वरी व्यवस्था आहे तिच्यावर ते फळ सोपवणंच अत्यंत उचित असतं. ती कर्मांशी निगडित अशा आपल्या प्रयत्नांसहइतर सर्व घटकांचा योग्य मेळ घालून, त्यांचा होणारा एकत्रित परिणाम फळाच्या रूपानं निर्माण करते. तो निर्माण करण्याची आणि झालेला परिणाम संबंधितांकडं पोचवण्याची जबाबदारी आपली नसते.

हे न ओळखता जर आपण हे एकत्रित परिणाम व फळ या क्षेत्रातलं काम करू गेलो तर आशा-निराशा, सुख-दुःख असल्या कुठल्यातरी द्वंद्वात आपण अडकण्याची व साधनेतली वाटचाल खुंटण्याची भीती असते.

तिसरं कारण निरपेक्षता हीच साधना आहे या संबंधी. ते असं की, अत्यंत आदर्श, उत्तम असं काम करणं ही जशी साधना आहे तसंच 'निरपेक्षता' ही त्याच साधनेच्या नाण्याची दुसऱ्या बाजूची साधना आहे.

आपला फळाशी संबंध नाही, मग कर्म कसंही केलं तरी चालेल, त्याची काळजी घ्यायची काही गरज नाही, हे जसं साधकाला म्हणता येत नाही, तसंच कितीही उत्तम काम केलं तरी त्याचं अमुक फळ यावं असंही त्याला म्हणता येत नाही आणि तो ज्या वेळी ही 'निरपेक्षते'ची साधना करतो तेव्हा मिळणारं फळ म्हणजेच देवत्व असतं. ज्याची अपेक्षा बाळगता येत नाही, ते पूर्ण निरपेक्ष झाल्यावर, निरिच्छ झाल्यावरच हाती पडतं.

चौथं कारण साधनेतल्या प्रगतीसंबंधी आहे. ते असं की, साधनेतली प्रगतीही त्या त्या माणसानं उपलब्ध शक्तींच्या साहाय्यानं

किती उत्तम कर्मं केली यावर ठरते, त्याच्या कर्मांना लौकिकदृष्ट्या कोणती फळं आली यावर ठरत नाही.

ही आणि अशी अनेक कारणं असल्यानं उत्तम कर्म आणि फळाविषयी निरपेक्षता या दोन्ही रुळावरून साधनी माणसाची गाडी सुखरूप आनंदाच्या गावी जाऊ शकते.

त्यातला एक विक्षेप म्हणजे फळाची अपेक्षा मनात येणं. यात अडचण अशी असते की, मनाला आजवर कुठलंही काम अपेक्षा ठेवूनच करायची सवय लागलेली असते. त्यामुळं इच्छा नसली किंवा साईबाबा म्हणतात ते कळलं, पटलं तरी नकळत अपेक्षेची भावना मनात येते. ती येऊ न देणंही आपल्या हातात नसतं.

यावर एक उपाय म्हणून अशी अपेक्षा माणूस म्हणून कदाचित आली तर साईबाबांनी म्हणल्याप्रमाणं तिची खंतही मनाला वाटावी. म्हणजे आपली साधनेतली होऊ शकणारी अधोगती टळेल व आजवरचा साधनप्रवास व्यर्थ जाणार नाही.

*

१६.

सद्‌गुरू माणसांचे बळी घेतात, आपल्याला आधी माणूस बनायचे आहे.

- श्री सहस्रबुद्धे महाराज

आपण 'माणूस' म्हणून जन्माला आलो आहोत, अशीच अनेकांची पक्की समजूत असते. त्यामुळं प्रथमदर्शनी आपण 'माणूस' बनण्याचा प्रश्नच कुठं आहे असं वाटण्याची शक्यता आहे. मग पुढं 'माणसांचे बळी' वगैरे विचार. त्यामुळं खरोखरच आपल्याला श्री बाबामहाराज म्हणतात त्यानुसार आधी माणूस बनण्याची गरज आहे का याचा विचार करू.

आपण माणूस म्हणून जन्माला आलो आहोत हे खरं, पण ते फक्त मनुष्य देहापुरतंच आहे. देह मनुष्याचा लाभला म्हणून प्रत्येक जण अंतरंगानं माणूस असेलच असं नाही. कारण माणूसपण हे काही बाह्य देहापुरतंच मर्यादित नाही. किंबहुना माणूसपण ही खरी आतली गोष्ट आहे आणि ती आपोआप जन्माला येत नाही. म्हणून माणूस दिसतो, माणुसकीचा मात्र अनुभव यावा लागतो. कृतज्ञता, दया, प्रेम, करुणा, सहानुभूती- अशा अनेक गोष्टी असतील ज्यांनी ही माणुसकी व्यक्त होत असेल. त्यातलं काही आपल्या ठिकाणी असल्याशिवाय किंवा आपल्या आचरणानं ते इतरांच्या अनुभवाला आल्याशिवाय आपल्याला 'माणूस' कसं म्हणता येईल ?

आता अनेकांना असंही वाटण्याची शक्यता आहे की, आपल्याठिकाणी तर असे सारे माणुसकीचे सद्‌गुण असतातच.

अनेकांच्या ठिकाणी ते असतीलही. त्यांच्याबद्दल आदर राखून या मुद्याचा थोडा अधिक विचार करू या.

उदाहरणादाखल आपण कृतज्ञतेचा विचार करू.कृतज्ञताबुद्धी हा माणसाचा माणुसकीतला एक अत्यंत आवश्यक गुणविशेष आहे. मनुष्य जन्माला येतो त्या खुद्द देहापासून तो कोणत्यातरी प्रकारे हा देह पुन्हा निसर्गाच्या स्वाधीन करेपर्यंत किती प्रकारच्या लोकांचे, घटकांचे किती उपकार आपण घेतो?

मुळात देहच दुसऱ्याकडून घेतो आणि तो विसर्जन करायलासुद्धा साधारणपणे इतरांचीच मदत त्याला लागते-इथंपर्यंतच्या दीर्घ प्रवासात तो इतक्या गोष्टी अन्न-पाणी-वारा-निवारा-विद्या-उद्योग-वेगवेगळ्या संस्था-शब्द-भाषा अक्षरशः अनंत गोष्टी माणूस निसर्ग आणि इतर माणसांकडून घेतो. माणूस तसा मूलतःच अपूर्ण, गरजू आहे. त्यामुळं या 'घेण्या'ला पर्यायही नाही. त्यात संकोचण्यासारखंही काही नाही.

पण या साऱ्या अपरंपार 'घेण्या'ची पदोपदी जाणीव ठेवून कुटुंबाचं, समाजाचं, समाजसंस्थांचं, राज्यव्यवस्थेचंही आपण जे 'देणं'लागतो ते कटाक्षानं वेळच्यावेळी आपण होऊन देऊन टाकणारे किती असतील ? घरात जन्मदात्यांना उपेक्षित ठेवून, कधी कधी त्यांची वृद्धाश्रमात रवानगी करून आपण आपल्या अवाजवी आसक्तीसाठी, इतरांच्या अनुकरणातून आलेल्या चैनीसाठी पैसा पैसा करीत देशी-विदेशी हिंडणारे दुर्मीळ आहेत का ?

स्वतःच्या निवाऱ्यासाठी चार झाडं तोडून घर बांधणाऱ्यातले किती त्याची जाणीव ठेवून चार झाडांची लागवड, रक्षण, जोपासना करणारे मिळतील ? समाजाचं ऋण फेडण्यासाठी आपणहोऊन पुढं येऊन आपल्या पगारातून देणगी देणारेही भेटतील. पण त्या मदतीची जाणीवठेवून ज्यासाठी ती मदत घेतली ती त्याच कामी वापरणारे,

देणगीदात्याची आयुष्यभर जाणीव ठेवून, आपली परिस्थिती सुधारल्यावर कृतज्ञतेनं त्यावेळच्या कुणा गरजूला आठवणीनं दुप्पट मदत करणारे किती भेटतील?

वडिलोपार्जित इस्टेटीचा आपला अगदी कायदेशीर हिस्साही आनंदानं आपल्या गरजू किंवा आईवडिलांना सांभाळणाऱ्या भावाबहिणीला देणारे किती कृतज्ञ भाऊबहीण मिळतील? त्यातही आपण होऊन जाणीव ठेवून हे करणाऱ्याला साथ देणारे त्यांचे किती पतीपत्नी, नातेवाईक मिळतील आणि 'तुम्ही का सोडता' असा उलट सल्ला देऊन जे कुणी अशी कृतज्ञता दाखवतात, औदार्य दाखवतात त्यांच्यातल्या थोड्याफार माणुसकीची दिशाभूल करणारे किती लोक भेटतील ?

जवळचं पाहायचं तर अगदी घरातल्या आपल्यासाठी निरलसपणे आयुष्यभर राबणाऱ्या एखाद्या आई-पत्नी-पती यांसारख्या कुटुंबातल्या सदस्यांच्या उपकारांची दखल न घेणारे भेटतात. घेतलेल्या पगाराशी प्रामाणिक राहून कष्ट न करणारे, दिलेल्या मूल्याशी प्रामाणिक राहून त्या किमतीची-दर्जाची वस्तू न देणारे भेटतात. तिथं जगाच्या उपकारांचं आणि कृतज्ञतेच्या माणुसकीचं काय वर्णन करावं ? पण आश्चर्य म्हणजे ही सर्व माणसं स्वत:ला चांगली माणसं समजतातच ना ?

आज सर्वत्र दिसणारी विषमता आणि दु:ख यांचं मूळ अकृतज्ञ माणसांच्यात असल्याचं जर प्रकर्षानं आढळत असेल तर मग आपल्याला 'माणूस बना' म्हणणाऱ्या संतांचं म्हणणं दुर्लक्षिण्यासारखं कसं असेल ? आपण होऊन समाजाचा वाटा देणारे कृतज्ञ तर भेटतच नाहीत, पण जो वाटा कररूपानं कायद्यानं द्यावा लागतो तोसुद्धा किती जास्तीत जास्त चुकवता येईल याच्या शोधात असणारे आणि त्याला अधिकाधिक प्रोत्साहन देणारे जर आपल्याला प्रत्यही भेटत

असतील तर 'आधी माणूस बना' म्हणण्यामागची संतांची तळमळ किती खरी असेल? माणुसकीतल्या याएका कृतज्ञतेच्या गुणाची ही स्थिती असेल तर इतर माणूसपणाची कल्पनाच केलेली बरी !

अशा अकृतज्ञ माणसांनीच या जगातलं निम्म्यापेक्षा जास्त दु:ख निर्माण केलेलं आहे आणि कायमही ठेवलेलं आहे. यामुळं समाजाचं जीवनमानही खालावतं आहे आणि व्यक्तींचीही अवनती घडते आहे. यासाठी आधी माणुसकीचे गुण कटाक्षानं अंगी आणणं हे किती गरजेचं आहे, हे स्पष्ट होईल.

परमार्थाचा प्रवास म्हणजे माणसाचा देवत्वाचा प्रवास. तो तर माणूसपणाच्याही पुढचा आहे. त्यासाठी हे सारे माणुसकीचे सद्‌गुण अंगी बाळगणाऱ्या माणसात उरणारे अहंकार, अज्ञान, भ्रम यांचे दोष नाहीसे करणारे म्हणजेच माणसाचे बळी घेणारे व फक्त देवत्व शिल्लक ठेवणारे सामर्थ्यवान सत्पुरुष सद्‌गुरुरूपानं कार्य करतात. ते हे कार्य करायला उत्सुक असतात, तळमळत असतात. पण त्यांना त्यासाठी जी 'खरी माणसं' लागतात ती बनणं हे आपलंच कार्य आहे. ते आपण प्रयत्नपूर्वक करू या आणि देहानंच नव्हे तर अंतर्यामानंही माणूस होऊ या !

*

१७.

चित्ताची शांतता मिळवली नसेल तर आपल्याइतर मिळकतींचा काय उपयोग आहे ?

- श्री रमण महर्षी

भूक आणि तहान यांची व्यवस्था माणसाला निसर्गतःच करावी लागते. बालपणी तो परस्वाधीन असल्यानं ती व्यवस्था इतर करतात, तो स्वाधीन झाल्यावर ती व्यवस्था तो स्वतः करतो. यासाठी मुळात काही स्वरूपात त्याचं 'मिळवणं' सुरू होतं. जीवनधारणेसाठी किमान म्हणून ते गरजेचं समजता येतं.

पण त्यातून कोणतीही गोष्ट हवी वाटली की, मिळवण्याची सवय सुरू होते. तिला एवढ्या फांद्या फुटतात, फाटे फुटतात की, मूळ गरजेला झाकून टाकणारा मिळकतींचा प्रचंड वृक्षच माणसागणिक तयार होतो. मुळात काही किमान गरजा आहेत आणि त्यापोटी आपण मिळवायला निघालो आहोत हे अनेकांना विसरूनच जायला होतं.

असं झालं म्हणजे मग एक घर पुरत नाही, एक प्लॉट पुरत नाही, दहा वस्त्रं पुरत नाहीत, शेकडो वस्तू पुरत नाहीत, गाड्या पुरत नाहीत, दहा लाखही पुरत नाहीत आणि काहींना दहा कोटीही पुरत नाहीत. एक पिढीला पुरून उरेल असं मिळवलेलंही पुरत नाही, दोनतीन पिढ्या जगू शकतील एवढं गोळा झालेलंसुद्धा पुरत नाही - मिळकतींचा डोंगर नकळत, अकारण साठत जातो. तिकडं असमाधानाचा खड्डा अधिकाधिक खोल होत जातो.

निसर्गानं ज्या गरजा उत्पन्न केल्या आहेत, त्या मूळ गरजांचं कार्य तसं खूप सोपं, सरळ, मर्यादित असतं. पाणी प्यालं की तहान भागते, दिलं तरी कुणी दुसरं भांडं पाणी पीत नाही. निसर्ग-शरीर ते मागत नाही, मिळवा म्हणत नाही. पण माणूस उद्यालाच काय दहा दिवसांना पुरेल एवढं पाणी मिळालं तरी एखादं मोकळं भांडं शिल्लक असेल तर पाणी आलंच आहे म्हणून भरून ठेवील, मिळवून ठेवील.

मुळात गरजेच्या गोष्टी मिळणं आणि त्यानं समाधान होणं ही निसर्गाची यंत्रणासुद्धा खूप साधी-सरळ आहे. पण आपला देश पाहिला नाही म्हणून डोळ्यांना, कानांना वाटणारं असमाधान सबंध देश पाहूनसुद्धा होत नाही. हळूहळू शेजारचा दुसरा-चौथा-पाचवा-दहावा पाहिला तरी पुन्हा एकदा बारावा तेरावा देश पाहायला निघालं तरी समाधान होईल याची खात्री नाही. ते किती देश पाहिल्यावर होईल याचीही खात्री नाही.

हीच गोष्ट घरादारांची आहे, वाहनांची आहे, समाजकार्यांची आहे, सत्तेची आहे, लौकिकाची आहे, लोकसंग्रहाचीही आहे. मुळात वस्तूची निकड लागली, ती मिळवली आणि समाधान झालं इतका सोपा असलेला हा व्यवहार एकदा मनाच्या, लोभाच्या, संचयाच्या, संग्रहाच्या-मार्गाला लागला म्हणजे माणसाला समाधानाच्या गावी कधीच नेत नाही, उलट अतृप्तीच्या मुक्कामी मात्र हमखास नेतो, असंच आढळेल.

परिणामी सारे व्याप करून अतृप्तीपोटी चित्ताला सतत अशांतता राहाते. विद्वत्तेचा सागर असलेले एरवी आदरणीय गृहस्थ पुस्तकाला - अर्थात त्यांच्या कितव्या तरी पुस्तकाला, प्रकाशक दाद मिळत नाही म्हणून उत्तरायुष्यात प्रचंड अस्वस्थ असलेले दिसतील तर गडगंज व्यापारी साठलेल्या पैशामुळं सतत चोरीमारीची,लूटलुटारूंची, दरोडेखोरीची भीती वाटून रात्रंदिवस मनानं अस्वस्थ असलेले

दिसतील.

बरं, हे केवळ संचय, समृद्धी यांच्या मागं असलेल्यांच्या वाट्यालाआहे असं नाही, तर ज्यांचे प्रपंच पोटापुरते आहेत, त्यांनाही कमी वस्तूंमुळं, कमी संचयामुळं समाधान किंवा शांतता आहे असं नाही. जास्तीचं नसल्यानं, अजून मिळवायचं असल्यामुळं किंवा इतरांना मिळत असल्यामुळं त्यांनाही अशांती असतेच. हा चित्ताच्या शांततेचा प्रश्न सर्वत्र तसाच कायम असल्याचं आढळून येईल.

याचं खरं कारण माणूस म्हणून जन्माला आल्यावर आपली खरी मिळकत कोणती, ती कशी मिळवावी, कधी मिळवावी, का मिळवावी याचा कुणी विचार करीत नाही, हे आहे. ती मिळकत मिळवण्याची आपल्यात असलेली क्षमता कुणी सहसा वापरत नाही, विचारात घेत नाही हे आहे. आपण आजूबाजूचे अनुभव किंवा आपले स्वत:चेही अनुभव पाहिले तर 'चित्ताची शांतता' ही माणसाची खरी अपरिहार्य, सर्वश्रेष्ठ, टिकाऊ मिळकत आहे, हे लक्षात येईल.

इतर मिळकती कितीही गोळा केल्या आणि चित्ताची शांतता कमावता आली नाही तर माणूस आनंदात राहू शकणार नाही हे आपण पाहिलंच. पण या 'चित्ताच्या शांती'च्या कमाईचं वैशिष्ट्य हे की, एक वेळ ही शांतीची मिळकत असली आणि इतर मिळकती कमी असल्या, वेळी नसल्या, तरीसुद्धा माणूस आनंदात राहू शकेल. म्हणून चित्ताच्या शांततेला महत्त्व द्यायला आपण किती लहानपणापासूनच शिकावं, हे लक्षात घेण्यासारखं आहे.

हेही लक्षात घेण्यासारखं आहे की,'चित्ताची अखंड शांत अवस्था' हे तर संतसत्पुरुषांच्या जीवनाचं सार आहे. त्यातल्या अनेकांच्या जीवनचरित्रात पाहिलं तर हे महापुरुष साधी परिस्थिती, अपुरी घरं, सामान्य वस्त्रं, माणसांचे अकाली वियोग, जाणवण्याइतकं दारिद्र्य, लौकिक शिक्षणांचे अभाव असल्या स्थितीत रहात असतात.

हे सत्पुरुष अत्यंत संवेदनाशील, सदैव सावध, प्रयत्नशील असूनही या खऱ्या मिळकतींच्या अभावातसुद्धा या 'शुद्ध शांत चित्ताच्या' अमूल्य मिळकतींनी एखाद्या राजाला लाजवील अशा आनंदात राहात असतात.

मग त्यांनी हे 'शांतीचं वैभव' कसं मिळवलं हे शिकून घेणं हाच त्यांच्या चरित्राचा-बोधाचा अत्यंत उपयुक्त अभ्यास ठरेल असं वाटतं.त्यासाठी प्रत्येक संत आपापल्या परीनं जीवनाच्या व काळाच्या ठेवणीनुसार मार्ग चाललेले दिसतील. ते कृतज्ञ आहेत,नम्र आहेत. कुणी मनाचा सातत्यानं शोध घेतात, कुणी निरपेक्षतेची -निरिच्छतेची साधना करतात, अशांती-कर्तृत्व-अहंकार यांचे लेप चित्ताला येऊ न देता कर्मयोग आचरतात, ईश्वरार्पण बुद्धीनं राहातात - अनेकानेक मार्गांनी प्राधान्यानं त्यांनी 'शांती' मिळवली आहे.

आपण निदान उपजीविकेच्या साधनेबरोबर जरी संतप्रणीत मार्गानं शांतीचं महत्त्व ओळखून, शांतीच्या प्राप्तीसाठी प्रयत्नशील राहिलो तर आयुष्यात 'खरी मिळकत' जरूर प्राप्त करू शकू.

*

१८.

अंधार कधी पडेल हे सांगता येत नाही, म्हणून उजेड आहे तोवरच साधना करा.

- श्री गुरुदेव रानडे

स्वत:च्या संकुचित आयुष्यापलीकडं, स्वार्थापलीकडं जायची बुद्धी सामान्य माणसाला होणं कठीण असतं. सत्कार्याची, उद्धाराची इच्छा होणं, विशेषत: अशी इच्छा टिकणं हे अत्यंत कठीण असतं. कारण देवत्वाची बुद्धी होणं, उत्तमात उत्तम होण्याची इच्छा होणं कितीही चांगलं आणि आदर्श वाटलं तरी ते एकप्रकारे प्रवाहाच्या उलट जाण्यासारखं असतं.

सर्वसाधारण प्रवाह जसा उताराकडं अगदी विनाकष्ट वाहातो तसंच जगही संकुचित - स्वत:पुरतं पाहाणारं - दांभिक अशा माणसांनी आणि त्यांच्या तशा कृतींनी भरलेलं असतं. अशा स्वार्थी कृतींचा प्रवाह अनंत काळापासून चालत आला असून अशा संकुचित दृष्टीच्या लोकांमुळं तो प्रवाह तसाच विनाकष्ट पुढंही चालूच राहाताना दिसेल.

बरं, स्वार्थी कृती या देहाला आणि मनाला तात्कालिक का होईना,सुखाच्या आणि वरवर फायद्याच्या असल्यानं त्या करीत राहाणं स्वत:लाही संयुक्तिक वाटतं आणि बहुतांश जगही तसंच स्वार्थदंभानं वागत असल्यानं त्या जगालाही ते संयुक्तिक वाटतं. प्रवाहाबरोबर जायला जशी शक्ती लागत नाही, तसंच पशुवृत्तीनं किंवा सामान्य माणसासारखं जगायलाही सोपं पडतं, बरेचसे लोक तसंच जगत

असल्यानं त्याला मान्यताही पटकन मिळते.

पण 'साधना' करायला जाणं म्हणजे स्वत:च्या व जगाच्या अंतिम हितासाठी वा कल्याणासाठी जगणं, नि:स्वार्थीपणे भगवंताच्या स्मरणात जगणं, देवासाठी जगणं हे जरी खरं हिताचं असलं तरी एवढी दूरदृष्टी, नरदेहाचं सार्थक करण्याची झेप वा सवय सर्वांना नसल्यानं अशी 'साधना' करणं प्रवाहाविरुद्ध जाण्यासारखं ठरतं. तसं जगायला निश्चयाचं, नैतिक व आत्मिक असं मोठं बळ लागतं. शिवाय इतर सामान्य स्वार्थी जगणाऱ्या आणि तेच बरोबर मानणाऱ्या सामान्य माणसांकडून उपेक्षा होते - विरोध होतो.

परिणामी,असं खरं आदर्श जगणाऱ्याचानिर्धार डळमळण्याची शक्यता असते. लोकांचा विरोध-टीका काय, स्वत:ची बुद्धी डळमळणं-फिरणं काय, शक्ती तोकडी पडणं काय, स्वत:त उत्पन्न होणारे विकल्प- शंका काय किंवा पुन्हा सामान्य स्वार्थी जीवनरीतीला शरण जाणं काय किंवा प्रयत्नाला अपयश आल्यास येणारी निराशा काय - कशा रूपानं अंधार पडेल आणि माणूस 'साधना' सोडील वा त्यात मागं पडेल हे सांगता येत नाही. म्हणून साधनेच्या सद्‌बुद्धीचा उजेड पडला आहे, तोवरच जास्तीत जास्त साधन करून ध्येयप्राप्ती करून घ्यावी हा मोलाचा विचार या वचनात मांडला आहे.

अशा सर्व अडीअडचणींचा व प्रामाणिकपणे साधना करू इच्छिणाऱ्यांना येणाऱ्या अनुभवांचा विचार केला तर या वचनाचं महत्त्व अधिक पटू शकतं. त्यातून या अडचणींवरचा एक मार्गही मिळतो. तो असा की, ही सद्‌बुद्धी जर आपल्याला भाग्यानं झाली असेल तर त्या उपदेशाप्रमाणं उदाहरणार्थ नाम घेणं, वाचन-मनन-ध्यान करणं किंवा जे काही साधन मिळालं असेल ते शक्यतो न रेंगाळता जलद करण्याचा प्रयत्न करणं. यात घाई करणं, लवकरात लवकर ध्येय गाठण्याची अधीरताअसणं किंवा इतर कुणाच्या आधी

साधनेत पुढं जाण्याची भ्रामक कल्पना असणं - असले नकारात्मक व अयोग्य अर्थ किंवा विचार नक्कीच नाहीत. तर सेंट पॉलला त्यांच्या गुरूंनी उपदेशात सुचवल्याप्रमाणं किंवा श्री गुरूदेवांकडून आत्मसात व विशेष अधोरेखित केल्या गेलेल्या या वचनात म्हटल्याप्रमाणं ही सद्‌बुद्धी एखाद्या दुर्मीळ प्रकाशासारखी आहे. एखाद्याला जाग उशीरा आली, रस्ता खूप चालायचा असला, तो रस्ता अपरिचित असला तर शक्यतो अंधार पडायच्या आत जास्तीत जास्त रस्ता चालण्याचा प्रयत्न जसा सामान्य माणूसही करतो आणि त्याचा त्याला फायदाही होतो तसं आपल्या या परमार्थप्रवासाचं आहे.

परमार्थबुद्धी हा दुर्मीळ उजेड आहे. आपण डळमळणं, बुद्धी न टिकणं,बुद्धिभेद होणं, सत्संग अंतरणं, जगाच्या स्वार्थी चालीरीतींना बळी पडणं - हा एक प्रकारचा अंधार आहे. एक वेळ सूर्य एकदा उगवल्यावर ठरावीक वेळ टिकेल, ठरावीक वेळी मावळेल पण हा सद्‌बुद्धीचा सूर्य किती वेळ टिकेल आणि कोणत्या क्षणी मावळेल व सामान्य निकृष्ट आयुष्याचा अंधार पसरेल हे सांगता येत नाही.

म्हणून पूर्वपुण्याईनं संतमार्गानं जायची सद्‌बुद्धी झाली असेल तर ती टिकून आहे तोवर जास्तीत जास्त साधना करून घ्यावी, ज्यामुळं रस्ताही कमी होईल, काही प्रवास घडल्यानं आपली सद्‌बुद्धीही टिकून राहाण्याइतपत बळकट होईल, मग अंधाराची चिंता नाही.

*

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :** श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)** : चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. कृपापदावली भाग : १ : भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. कृपापदावली भाग : २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. साधनपदावली भाग १ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. सारविस्तार भाग : १ : चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) : डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात : आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)

श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. संतबोध : भाग ४ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार : मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. उत्तरायण -भाग ३ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. अनुभवपुष्पे - भाग २ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. श्रद्धा : श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. अनुभवपुष्पे - भाग ३ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. अर्घ्य : ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. जीवनचिंतन : दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. स्वास्थ्यसंवाद : मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. वचनांजली भाग १ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. अक्षरायण : आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. वचनांजली भाग २ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. भावगीता : श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

***

नराचे नारायण होणारे संत म्हणजे या युगातले सार्वत्रिक व दृश्य चमत्कार होत. स्वतःसारखी देवत्वाची स्थिती इतर सामान्य माणसांना मिळावी म्हणून निरहंकार, निःस्वार्थी व निःस्पृह वृत्तीनं संत आपलं आयुष्य सर्वांसाठी वेचतात. संतांचा मार्ग शिकण्याचं एक सोपं साधन म्हणजे त्यांची अनमोल वचनं. संतवचनांतून मिळणारा बोध व्यक्तीला जागं करतो, प्रेरणा देतो, नवी दृष्टी देतो.

अशा निवडक संतवचनांचं निरूपण

संतबोध

या पुस्तकमालिकेतून

सादर होत आहे.

त्यांच्या बोधाचे चिंतन । आम्हा घडो रात्रंदिन ।।
आचरणाची नित्य सेवा । दीन म्हणे घडो देवा ।।